**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जयराज गोविंदराव तेलंगे, : अपिलार्थी
रा.अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
व्यवस्थापक, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक लि.,मुख्य शाखा, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - व्यवस्थापक, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक लि.,मुख्य शाखा,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक (प्रशासन),सहकारी संस्था,लातूर - प्रतिनिधी - श्री. बी.सी.पवार, मुख्य लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक लि,मुख्य शाखा यांच्याकडून सन २००६ ते २००८ या दरम्यान अहमदपूर येथील शाखेत पिक विमा अंतर्गत झालेल्या कथित भ्रष्टाचारासंदर्भात ५ मुद्यांवर माहिती मागितली आहे. सरव्यवस्थापक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.लातूर यांनी दि. १५.०९.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे की, त्यांच्या बँकेस माहिती अधिकार अधिनियम लागू नाही, त्यामुळे माहिती पुरविण्यास बँक असमर्थ आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. यासाठी या प्रकरणी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था लातूर यांना आयोगातर्फे जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासह प्रकरण पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.१४.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जयराज गोविंदराव तेलंगे, थोडगा रोड,नागेश कॉलनी, अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक लि.,मुख्य शाखा,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सहायक निबंधक (प्रशासन),सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,लातूर यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह)या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

नगर परिषद, उदगीर, जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा

मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अंतर्गत लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर- श्री.अंबेसंगे व्ही.के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर - श्री. एस.टी.चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १५.०२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये त्रयस्थ व्यक्तीच्या मालमत्तेच्या नामांतराबाबत व कर आकारणीसंदर्भात सन १९७२ तसेच १९८० सालातील एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. सदरची माहिती जुनी असल्याकारणाने संचिकेचा शोध घेऊन माहिती उपलब्ध करण्यास एक महिन्याचा कालावधी पुरेसा नाही. तथापि उपलब्ध माहिती अपिलार्थीस दि. १८.०३.२०१० रोजी अपिलार्थीस समक्ष देण्याचा प्रयत्न करण्यात आला, कारण की, अपिलार्थी समक्ष माहिती घेणार होते. त्यावर अपिलार्थीने माहिती अपूर्ण आहे म्हणून घेता येत नाही, असे नमूद करुन माहिती स्वीकारली नाही. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये खासदुतामार्फत अपिलार्थीस माहिती पाठविली. ती अपिलार्थी यांनी स्वीकारली आहे. त्याची नोंद दप्तरी उपलब्ध आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर आहे. तथापि अपिलार्थीस सात दिवसांने उशिरा माहिती देण्यात आली आहे. यापुढे माहिती मुदतीत देण्यात यावी. सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते.

आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १९.०७.२०११ रोजीच्या पत्रान्वये सुनावणीस वैद्यकीय कारणाने उपस्थित राहू शकत नाही, असे आयोगास कळविले आहे. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि. ३०.०९.२०१० रोजीचे आहे. यावरुन त्यांना माहिती मिळालेली आहे, असे दिसून येत आहे. अप्राप्त माहितीबाबत अपिलार्थी यांनी नमूद केलेल्या मुद्दा क्र.४-अ ची माहिती अभिलेखात उपलब्ध नसल्यामुळे देता आली नाही असे दिसून येत आहे. मुद्दा ६-अ ची माहिती देण्यात आली आहे व मुद्दा ५-अ चा उल्लेख अपिलार्थीच्या मूळ अर्जात नाही. अपिलार्थी यांनी ११ दिवस विलंबाने माहिती देण्यात आली त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना दंड लावण्यात यावा, अशी विनंती केली आहे. आयोगासमोर सादर केलेली कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी फार जुन्या कालावधीची माहिती मागितली आहे. ही माहिती शोधून काढून अपिलार्थीस देण्याकरिता जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी कर्मचारी यांनी प्रयत्न केलेला आहे. सदरची माहिती एक महिन्यात उपलब्ध झाली नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आयोगास योग्य वाटते, म्हणून शास्ती लावणे आवश्यक नाही.

प्रसंगावशात्, अपिलार्थी हे ज्येष्ठ नागरिक असल्याचे दिसून येत आहे. याकरिता त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली असली तरीही माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती व त्यासंदर्भातील पत्रव्यवहार अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे करण्यात यावा.

अतः आयोगाचे स्तरावर अपील प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात

येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग,रा. दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर - ४१३५१७.

२. जन माहिती अधिकारी तथा अंतर्गत लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश दगडू होळे, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर - श्री. एम.एन.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी-उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर- श्री. वाय.बी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर - श्री. राजेंद्र सावळेराम राहाणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी लातूर जिल्हयांअंतर्गत एकूण ८९ कामाबातची अत्यंत विस्तृत अशी माहिती मागितली आहे. त्यामध्ये कामाच्या मोजमापपुस्तिकेची प्रत, कामाचे अंदाजपत्रकाच्या प्रती, दिलेल्या बिलाची प्रत,तांत्रिक मंजूरीची प्रत,प्रशासकीय मान्यतेचे आदेश, गुणनियंत्रण अहवालाच्या प्रती, इ.माहिती मागितली आहे. सदरची माहिती एकंदर ८ उपविभागीय कार्यालयामध्ये विखुरलेली असल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १५.०४.२०१० रोजी कलम ६(३) नुसार विहित मुदतीत पाठविण्यात आला. या आठ जन माहिती अधिकारी यांच्यापैकी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीस दि. ११.०५.२०१० रोजी माहितीच्या शुल्कापोटी ₹५६९/- चा भरणा करावा असे कळविले आहे. त्याचप्रमाणे सहायक अभियंता श्रेणी-१,सा.बां.इमारती उपविभाग, लातूर यांनी दि. १७.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे ₹७४०/- भरण्याचे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रथम अपील केल्यावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी निर्णय घेतला की, "अपिलकर्त्याने विभागीय कार्यालयाची व सा.बां.इमारती उपविभाग लातूर यांचेकडील माहिती शुल्काचा भरणा करुन प्राप्त करुन घ्यावी. तसेच शासकीय माहिती अधिकारी, सा.बां.उपविभाग क्र.२ लातूर/औसा/रेणापूर/चाकूर/अहमदपूर यांनी माहिती अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी. त्याच प्रमाणे अर्जदाराने सा.बां.उपविभाग क्र.१ लातूर यांचेकडील माहिती प्राप्त झाल्याचे निदर्शनास आणले."

आयोगासमोर सादर करण्यात आलेला युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती अपेक्षित केली आहे, त्यामुळे त्यांनी माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधणे आवश्यक ठरत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांनी मागितलेल्या माहितीसाठी शुल्क भरल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपूर्ण माहिती दिली आहे व प्रथम अपिलाचा सुनावणीची प्रत देण्यात आली नाही, असे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीचा अर्ज पाहता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड आहे. अशाप्रकारची माहिती मागितल्याने शासकीय प्राधिकरणाकडील साधनसामग्री व मनुष्यबळ मोठया प्रमाणावर वळवावी लागतात. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही व त्यामुळे माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरु शकतो. प्रसंगी अशाप्रकारच्या

माहिती अर्जांवर केंद्रीय माहिती आयोगाने माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय घेतलेले आहेत.

तथापि या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती पुरविण्यामध्ये सकारात्मक भूमिका घेतलेली दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता या टप्प्यावर सदरचे प्रकरण बंद करण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश दगडू होळे, रा.सुळ गल्ली,खडक हनुमान मंदिर, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नानासाहेब हणुमंत कांबळे, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर - श्री. वाय.बी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, लातूर - श्री. एम.एन.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर - श्री. राजेंद्र सावळेराम राहाणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दुसरे अपिलार्थी श्री. गणेश होळे यांनी मागितलेल्या माहितीशी तंतोतंत जुळत आहे व या द्वितीय अपीलाची सुनावणी अपील क्र. ११०१/१० आज दि. १०.०८.२०११ रोजी आयोगासमोर झालेली आहे. या दोनही अपील अर्जाचे अर्जदार वेगवेगळया व्यक्ती असूनही दोन अर्जामध्ये अर्जदाराच्या स्वाक्षरीच्या रकान्यामध्ये केलेली स्वाक्षरी मात्र एकाच व्यक्तीने केलेली आहे. अपिलार्थीस दि.१० मे २०१० रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांनी अपिलार्थीस कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ओळख पटवावी जेणेकरुन माहिती देणे शक्य होईल, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिलेला नाही.

आयोगासमोर सादर करण्यात आलेला युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती अपेक्षित केली आहे, त्यामुळे त्यांनी माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधणे आवश्यक ठरत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपूर्ण माहिती दिली आहे व प्रथम अपिलाच्या सुनावणीची प्रत देण्यात आली नाही, असे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीचा अर्ज पाहता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड आहे. अशाप्रकारची माहिती मागितल्याने शासकीय प्राधिकरणाकडील साधनसामग्री व मनुष्यबळ मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही व त्यामुळे माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरु शकतो. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर केंद्रीय माहिती आयोगाने माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय घेतलेले आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता या टप्प्यावर सदरचे प्रकरण बंद करण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०८-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नानासाहेब हणुमंत कांबळे, द्वारा श्री.गणेश दगडू होळे, रा.सुळ गल्ली, खडक हनुमान मंदिर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भताने जगन्नाथ रामचंद्र, : अपिलार्थी
रा.रायवाडी, ता.चाकूर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, सजा महाळंगी, ता.चाकूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मंडळ अधिकारी, झरी बु.,ता.चाकूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भताने जगन्नाथ रामचंद्र | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तत्कालीन तलाठी, महाळंगी, ता.चाकूर,जि.लातूर - श्री. व्ही.एस.वजिरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मंडळ अधिकारी, झरी (बु.), ता.चाकूर, जि.लातूर - श्री. एस. जी. कांबळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.१०.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ व्यक्तीसंदर्भात असून सदर त्रयस्थ व्यक्ती एक निराधार महिला आहे. या त्रयस्थ व्यक्तीच्या जमिनीवर खोटा फेरफार झाला आहे,अशी त्यांची धारणा आहे. याकरिता त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मौ. रामवाडी येथील गट क्र.३१ चा ७/१२, फेर क्र. ३५९ च्या प्रती व त्यासंदर्भातील इतर माहिती मागितली आहे. त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला आहे की, अपिलार्थीने माहितीच्या अधिकारातील अर्ज जन माहिती अधिकारी, तलाठी सजा महाळंगी कार्यालयात रितसर अर्ज करुन आवश्यक ती माहिती हस्तगत करुन घ्यावी.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३)नुसार तहसीलदार अथवा मंडळ अधिकारी यांनी स्वतःहून ५ दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी तथा संबंधित तलाठी यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे या कलमाचा भंग झालेला आहे. तसेच तलाठी,सजा महाळंगी यांनी आज त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, या अपिलासंदर्भातील माहितीसाठीचा मूळ अर्जच त्यांना प्राप्त झालेला नाही.अर्ज प्राप्त होताच माहिती देण्यात येईल.

वरील सर्व बाबी विचारात घेता व अपिलार्थी यांची या संदर्भात केलेली विनंती तक्रार समजून अधिनियमातील कलम १८(३) अन्वये आयोगास दिलेल्या अधिकारानुसार तहसीलदार,चाकूर, जि.लातूर व उपविभागीय अधिकारी, उदगीर,जि.लातूर यांची विशेष साक्ष सुनावणीच्या वेळी लावण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अद्ययावत माहितीसह त्यांना उपस्थित राहावे लागेल. तसेच अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, महाळंगी, ता. चाकूर, जि. लातूर यांना उपस्थित राहावे लागेल. हे आयोगाचे अंतरिम आदेश समजून आज रोजी आयोगासमक्ष जन माहिती अधिकारी यांना देण्यात आलेल्या अपिलार्थीच्या मूळ अर्जानुसार पंधरा दिवसांचे आत माहिती देण्याची व्यवस्था करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

१) अंतिम निर्णयासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जानुसार मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य द्यावी.

३) पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी वस्तुनिष्ठ माहितीनिशी तसेच तहसीलदार, चाकूर व उपविभागीय अधिकारी,

उदगीर,जि.लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे विशेष साक्षीकरिता व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भताने जगन्नाथ रामचंद्र, रा.रायवाडी, पो. महाळंगी, ता. चाकूर, जि. लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, महाळंगी, ता.चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, झरी (बु.), ता.चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. उपविभागीय अधिकारी, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी (रोहिणेकर), : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, चाकूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, चाकूर, जि.लातूर - श्री. जिवनदास शिवाजी निरंजन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, चाकूर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी (रोहिणेकर), श्रीकृष्णनगर, सम्राट चौक, लातूर -४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किशन दादाराव तरटे, : अपिलार्थी
रा.गुरधाळ, ता.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, देवणी, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, देवणी, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११०५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. किशन दादाराव तरटे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार,तहसील कार्यालय देवणी, जि.लातूर - श्री. पी.डी.पाटील | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, देवणी, जि.लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे सन २००६-०७ व २००७-०८ या कालावधीची बोरोळ, ता. देवणी येथील जमिनीत उसाचे पिकाच्या नोंदीबाबत एकंदर १० मुद्यांद्वारे माहिती मागितलेली आहे.

हा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांनी तहसील कार्यालय, देवणी येथील संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांच्याकडे केलेला आहे. ही माहिती ज्या जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांच्याकडे उपलब्ध आहे, त्यांच्याकडे कलम ६(३) अन्वये माहितीचा अर्ज पाच दिवसांच्या आत पाठविणे आवश्यक होते. तथापि सदरचा अर्ज ३७ दिवसांनंतर संबंधित तलाठी यांच्याकडे पाठविण्यात आला. या माहितीच्या साक्षांकित प्रतीची त्यांना आवश्यकता आहे. मुद्दा क्र. ६ व १० ची माहिती त्यांना अप्राप्त आहे. मुद्दा क्र. ८ ची माहिती अपूर्ण आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांची बाजू मांडताना सांगितले की, त्यांना दिलेली माहिती सर्व मुद्यांशी संबंधित नसून नेमकी देण्यात आली नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १०.०५.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी दिलेली तसेच जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी सुनावणीच्या वेळी दिलेली माहिती यांची तौलनिक पाहणी करुन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यात आली आहे किंवा कसे,याबाबतची चौकशी करावी लागेल व उर्वरित मुद्यांशी संबंधित माहितीच्या साक्षांकित प्रती संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीस देतील, अशी व्यवस्था करावी लागेल. अशी कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी, लातूर यांना आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे. त्यांनी अपर जिल्हाधिकारी, लातूर यांच्यामार्फत प्रकरणात पूर्ण चौकशी करुन अपिलार्थीच्या माहिती अर्जातील मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस मिळेल याची व्यवस्था करावी. तसेच चौकशीअंती या माहिती अर्जाशी संबंधित ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा भंग झाल्याचे आढळून आल्यास त्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जिल्हाधिकारी, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याच्या आत कार्यवाही पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १०-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशन दादाराव तरटे, रा.गुरधाळ, ता.उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपिलार्थी
रा.टेंभुर्णी, ता.अहमदपूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय,गंगाखेड,जि.परभणी- श्री. भाऊसाहेब थोरात | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार (प्रभारी), गंगाखेड, जि. परभणी - श्री. भाऊसाहेब थोरात | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे

सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, रा.टेंभूर्णी, पो. ता.अहमदपूर,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय,गंगाखेड,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनंत गोविंद पारसेवार, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, उदगीर,
जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर,जि.लातूर - श्री. क्षीरसागर व्ही.बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उदगीर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १५.०२.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये जानेवारी, २००६ ते ३१.१२.२००९ या कालावधीत उदगीर शहरातील तीन रास्त भाव दुकानातील शिधापत्रिका शोध मोहिमेअंतर्गत दाखल केलेल्या अर्जांची व शिधापत्रिका धारकासंदर्भात माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०२.२०१० रोजी अपिलार्थीस माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती पाहण्यास यावे, असे अधिनियमातील कलम ७(१) मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार विहित मुदतीत कळविले आहे. या पत्रावर अपिलार्थी यांची पोचस्वाक्षरी आहे. माहितीची पाहणी केल्यानंतर माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी दि. २३.०३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले व दि. २४.०५.२०१० रोजी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थीस दि. २५.०६.२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती पाहणीसाठी दि. २६.०६.२०१० रोजी येण्याचे सूचविल्यामुळे अपिलार्थी यांनी माहितीची पाहणी केली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे. आयोगापुढे अपिलार्थीचे दि. २७.०६.२०१० रोजी नायब तहसीलदार (पुरवठा) यांना दिलेले पत्र आहे. त्यामध्ये त्यांनी माहितीची पाहणी केली आहे, आता त्या माहितीच्या संदर्भात तक्रार नाही, असे नमूद केले आहे. अपिलार्थीचे द्वितीय अपील दि. २४.०५.२०१० रोजीचे आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी सक्रीय होते, असेही आयोगाच्या निदर्शनास वरीलप्रमाणे आले आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, गोविंदराज प्रिटींग प्रेस, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अंकुश बापुराव आंबेकर, : अपिलार्थी
रा. कोळपा, ता.जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अंकुश बापुराव आंबेकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय,लातूर- श्री.कांबळे एल.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, लातूर - श्री. बप्पासाहेब थोरात | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०२.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०४.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२००८ |

(फेरसादर,,दि.२२.०४.२०१०)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून ,उपविभागीय अधिकारी कार्यालय, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात गट क्र. १३४ ची संपूर्ण संचिका पाहण्यास देण्यात आली होती व त्याच्या झेरॉक्स प्रतीही (दि.१३.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे) देण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये, - एखाद्या गावाचे भूसंपादन ज्या उद्देशासाठी आधी केले आहे, त्याचा वापर पूर्ण न होताच नव्याने अतिरिक्त भूसंपादन ज्या कायद्याच्या तरतुदीनुसार करता येते, त्याची प्रत - अशी माहिती मागितली आहे.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीने मागितलेली माहिती व अपिलार्थीस द्यावयाची माहिती यामध्ये संभ्रम निर्माण झाला होता, असे दिसते. तथापि अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मागितलेली वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस देय होत आहे. त्यासंदर्भातील सर्व शासन निर्णय/परिपत्रके/वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचना इ.च्या प्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित सर्व शासन निर्णय/परिपत्रके/वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचना इ.च्या प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंकुश बापुराव अंबेकर,रा. कोळपा,पो.कासारखेडा, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संगमे सचिन चंद्रकांत, | : | अपिलार्थी |
| संगमे निवास, नोबल कॉलनी, उदगीर, जिल्हा लातूर | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर<br>- श्री. शेख नजीरोद्दीन मो.इस्माईल | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १३-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये इयत्ता पाचवी जोडतुकडीच्या प्रस्तावाबाबत विमलताई माध्यमिक विद्यालय, दवणहिप्परगा, तालुका देवणी या शाळेची सन २००० ते २००९ या कालावधीतील एकूण सात मुद्दयावर विस्तृत माहिती मागितली आहे. त्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ३ ची माहिती शासनाकडे उपलब्ध असल्याकारणाने विशेष बाब म्हणून शासनाकडून प्राप्त करुन अपिलार्थीस देण्यात आली आहे. बाकीच्या मुद्दयाची त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना दिनांक ०९-०८-२०११ रोजीचे पत्र दिलेले आहे ते आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक १३-११-२००९ च्या माहिती अधिकार अंतर्गत मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ ते ७ ची माहिती त्यांना प्राप्त झाली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे तथापि माहिती देण्यास विलंब झाला आहे, याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचारी यांना भविष्यात दक्ष राहण्याकरिता सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संगमे सचिन चंद्रकांत, संगमे निवास, नोबल कॉलनी, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार, : अपिलार्थी
रा. बेलसकरगा, पो. मोघा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर - श्री. पी. व्ही. नवसारे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०५-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी,निलंगा यांना श्री. गुळभेले व श्री. कन्हेरे यांची बदली होणे बाबतच्या चौकशीतील सर्व अर्जदारांच्या जबाबाच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. या चौकशी प्रकरणी त्रयस्थ साक्षीदार आहेत. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ८ (छ) नुसार माहिती देय होत नाही म्हणून देण्याचे नाकारले आहे. त्याचप्रमाणे सदर माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने त्रयस्थांनी माहिती देण्यास आक्षेप घेतला आहे.जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ६-१०-२०१० रोजी सुनावणी घेतली .सुनावणीनंतर दिनांक ०३-११-२०१० रोजी प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी निर्णय दिला आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (छ) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे ही बाब योग्य दिसून येत आहे. सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप, आयोगापुढील युक्तिवाद व जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय विचारात घेता या प्रकरणातील माहितीच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम कलम 8 (1) (g) व 8 (1) (j) अन्वये माहिती उघड करण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यापक जनहिताच्या कसोटीची पुर्तता होत नाही असे आयोगाचे मत आहे

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १०-०८-२०११**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार, रा. बेलसकरगा, पो. मोघा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अनिल पांडुरंग बोंद्रे,<br>कार्यालय अधीक्षक, पोलीस प्रशिक्षण विद्यालय,<br>बाभळगांव, लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. पी. व्ही. नवसारे, पोलीस उप अधीक्षक, निलंगा | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-१२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त न झाल्यामुळे त्यांच्या कार्यालयात प्रथम अपिलाची सुनावणी झाली नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्याकडे प्रकरण प्रथम अपिलाच्या प्रतीसह परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल पांडुरंग बोंद्रे, कार्यालय अधीक्षक, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, बाभळगांव, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शशि विष्णुपंत काळे, : अपिलार्थी
रा. मौ. वांजरखेडा, तालुका जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस उप अधीक्षक (गृह), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर - प्रतिनिधी - श्री. पी. व्ही. नवसारे, उप अधीक्षक, निलंगा | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झ ालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमत: सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्याकडे प्रकरण प्रथम अपिलाच्या प्रतीसह परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शशि विष्णुपंत काळे, रा. मौ. वांजरखेडा, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अनुरथ तात्याराव चांदमारे,<br>नेताजीनगर, कैलासनगरच्या बाजूला, लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यामंदिर,<br>जुना औसा रोड, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यामंदिर,<br>जुना औसा रोड, लातूर - श्री. घोडके मधुकर रामराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर<br>- श्री. विलास का. जोशी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २५-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये एकूण सहा मुद्दयावर लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यामंदिर, लातूरची माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक १ ते ४ ची माहिती दिनांक ११-०३-२०१० रोजी म्हणजे विहित मुदतीत कलम ७ (१) नुसार अपिलार्थीस दिली आहे. मुद्दा क्रमांक ६ व ७ ची माहिती संस्थेशी संबंधित आहे. तथापि त्यातील त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिनांक १४-०७-२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. उर्वरीत मुद्दा क्रमांक ५ व ६ ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी वरील बाबींची नोंद घेऊन दिनांक २६-०५-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, मुद्दा क्रमांक ५ व ६ ची माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत देण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही अवगत केले की मुद्दा क्रमांक ६ व ७ ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही असे अपिलार्थीस दिनांक १४-०६-२०१० रोजी कळविले आहे व उर्वरीत माहिती संस्थेकडून घ्यावी असे कळविले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यामंदिर, लातूर यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे असे दिसून येत आहे जी माहिती मुख्याध्यापकाच्या कार्यालयात उपलब्ध नाही त्याच्याकरिता अपिलार्थी संस्थेच्या सचिवाकडे स्वतंत्र माहितीचा अर्ज करु शकतात.

या सर्व बाबींचा विचार करता आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनुरथ तात्याराव चांदमारे, नेताजीनगर, कैलासनगरच्या बाजूला, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यामंदिर, जुना औसा रोड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ठोके दिलीप नारायण (संपादक), : अपिलार्थी
सा. महाराष्ट्र शासन, बार्शी रोड, हनुमान मंदिरामागे,
प्रकाशनगर, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य, गंगाधर पाटील साकोळकर उच्च माध्यमिक
विद्यालय, देवर्जन, तालुका उदगीर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ठोके दिलीप नारायण | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, गंगाधर पाटील साकोळकर उच्च माध्यमिक विद्यालय, देवर्जन, तालुका उदगीर, जिल्हा लातूर<br>- श्री. सोनटक्के टी. डी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उप संचालक, लातूर विभाग लातूर - प्रतिनिधी<br>- श्री. शेख एन. आय., सहायक शिक्षण संचालक | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०९-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, लातूर विभाग, लातूर यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण दोन मुद्दयावर सन २००५ ते २०१० या कालावधीतील विस्तृत माहिती मागितली आहे. सदरच्या माहितीची व्याप्ती विचारात घेता त्यांच्याकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ व साधनसामग्री विचारात घेता ही माहिती त्यांना विहित मुदतीत एका महिन्याच्या आत देणे शक्य नव्हते. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, लातूर विभाग, लातूर यांच्याकडे दिनांक २८-१२-२०१० रोजी प्रथम अपील सुनावणी झाली त्यावर निर्णय देण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्यात यावी. दरम्यानच्या काळात माहिती एकत्रित करुन सुमारे ५०० पृष्ठांची माहिती संकलीत करुन त्याच्या छायांकीत प्रती काढून अपिलार्थीस ०६-०१-२०११ रोजी देण्यात आलेल्या आहेत. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांना माहिती मिळाली आहे असे मान्य केले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ठोके दिलीप नारायण (संपादक), सा. महाराष्ट्र शासन, बार्शी रोड, हनुमान मंदिरामागे, प्रकाशनगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गंगाधर पाटील साकोळकर उच्च माध्यमिक विद्यालय, देवर्जन, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, लातूर विभाग लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वराट विश्वंभर सोनाजीराव,<br>मु. पो. भोकरंबा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, भगतसिंग विद्यालय, पळशी, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वराट विश्वंभर सोनाजीराव | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, भगतसिंग विद्यालय, पळशी, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. प्रतीवर दिनांक नाही |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांचे वकील श्री. व्ही. यु. जाधव व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वराट विश्वंभर सोनाजीराव, मु. पो. भोकरंबा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, भगतसिंग विद्यालय, पळशी, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कांबळे निवृत्ती गणपती, : अपिलार्थी
मु. पो. शिवणी बु. तालुका औसा, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, किल्लारी,
तालुका औसा, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा,
जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, किल्लारी,<br>तालुका औसा, जिल्हा लातूर - श्री. शेख शौकत अली ईलायत अली | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा,<br>जिल्हा लातूर - श्री. प्रभाकर भुजंगराव कदम | : उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०५-२०१० फेरसादर दिनांक ०२-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १६-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये सन २००६ पासून फेब्रुवारी २०१० पर्यंत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत केलेल्या कामाची विविध मुद्दयावर विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या अर्जावर नियमाप्रमाणे स्टॅम्प नसल्यामुळे तसे अपिलार्थीस कळवून अपिलार्थीचा अर्ज दिनांक २४-०२-२०१० रोजी निकाली काढण्यात आला. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीचा अर्ज नियमानुसार नसल्यामुळे निकाली काढण्यात येत आहे असे अपिलार्थीस कळविले आहे. तथापि जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, किल्लारी यांनी दिनांक ३०-०३-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले की, त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असल्यामुळे त्याकरिता झेरॉक्स प्रती काढण्याकरिता निधी उपलब्ध नाही म्हणून ग्रामपंचायत स्तरावर कार्यालयात उपस्थित राहून माहिती पाहण्यात यावी व आवश्यक त्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती देण्यात येतील. माहिती उपलब्ध आहे व व्यक्तिशः घ्यावी असे दिनांक १२-०४-२०१० ला अपिलार्थी यांना कळविले तथापि अपिलार्थी उपस्थित झाले नाही. अपिलार्थीने प्रतिसाद दिला नाही म्हणून जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, किल्लारी, तालुका औसा, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीस पोस्टाने दिनांक १३-०४-२०१० ला माहिती पाठविली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना पुन्हा एकदा माहितीची पाहणी करण्याकरिता आणखी एक संधी देण्यात यावी याकरिता नोंदणीकृत टपालाने कळवून एक तारीख निश्चित करुन अपिलार्थीस कळविण्यात यावे व पाहणी द्यावी व त्यानंतर काही कागदपत्राची आवश्यकता असल्यास विनामूल्य देण्यात याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे निवृत्ती गणपती, मु. पो. शिवणी बु. तालुका औसा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, किल्लारी, तालुका औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देविदास रामराव गायकवाड, : अपिलार्थी

श्री. मावूली, दत्तमंदिरमागे, जुना औसा रोड, ड्रायव्हर कॉलनी, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर<br>श्री. डॉ. जमादार बी. टी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. पाटील बी. एस., कक्ष अधिकारी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १६-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचे लेखी निवेदन आयोगास सादर केले आहे. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत त्यांची बाजू ऐकून घेण्यात आली.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०७-२०१० रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर दिनांक १०-०८-२०१० रोजी सुनावणी ठेवली होती. या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी मुदतीत माहिती मिळाली नसल्याचे सांगितले. मुद्दा क्रमांक १ ची माहिती मिळाल्याचे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, अपिलार्थीस दिनांक १२-०७-२०१० रोजी प्रत्यक्ष माहिती देऊ केली असता त्यांनी ती घेण्याचे नाकारले त्यामुळे माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविण्यात आली. अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ व मुद्दा क्रमांक ३ व ५ ची माहिती दिल्याचे आढळून येत आहे. उर्वरीत मुद्दयामध्ये अपिलार्थीने कार्यवाहीचे स्पष्टीकरण मागितल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये स्पष्टीकरण देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड, श्री. मावूली, दत्तमंदिरमागे, जुना औसा रोड, ड्रायव्हर

कॉलनी, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लिगाडे ओमशिवा विश्वनाथ, : अपिलार्थी
'मुक्ताई निवास', साईप्रेम अपार्टमेंटच्या पश्चिमेस,
विशालनगर, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव, तालुका चाकूर,
जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी, :
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव, तालुका चाकूर,
जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३१२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लिगाडे ओमशिवा विश्वनाथ | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ लिपिक (अधीक्षक), शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर<br>- प्रतिनिधी ॲड विजयकुमार वि. सलगरे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०७-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०९-१०-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-१२-२००९<br>फेरसादर दिनांक<br>०६-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांच्याकडे एकूण दहा मुद्दयावर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. सदरची माहिती १९९८ ते आजपर्यंत (अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत) मागितली आहे. अशी माहिती संकलीत करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी पुरेसा नाही तरी माहिती संकलीत करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली व अपिलार्थीस दिनांक ०९-१०-२००९ रोजी माहितीपोटी रुपये ५००० इतके शुल्क भरण्यात यावे असे कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी रुपये ५००० इतक्या शुल्काचा चा भरणा दुस-याच दिवशी (दिनांक १०-१०-२००९) केलेला आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर त्यांनी सुनावणी घेतली तेव्हा माहिती देण्यास उशीर का लागतो याबाबत विचारणा केली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ व सध्या अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे माहिती संकलीत करण्यास वेळ लागतो आहे असे सांगितले व लवकरात लवकर माहिती संकलीत करुन अपिलार्थीस द्यावी असे ठरले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस समक्ष कल्पना दिली की, माहिती उपलब्ध आहे ती घेऊन जावी. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. अपिलार्थी कार्यालयात उपस्थित होते त्यांनी माहितीची पाहणी करुन माहिती घेण्यास नकार दिला. त्यानंतर अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविण्यात आली ती माहिती अपिलार्थीने न घेतल्यामुळे दिनांक ११-०३-२०१० रोजी परत आली. आयोगास परत आलेल्या माहितीची संचिका पोस्टाच्या शे-यासह दाखविण्यात आली.

अपिलार्थीने अवगत केले की, त्यांना संपूर्ण माहितीची आवश्यकता आहे. त्यांनी व्दितीय अपील केल्यामुळे माहिती स्विकारली नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना आवश्यक आहे अशी त्यांनी विनंती केली.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सन १९९८ पासून अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत एकंदर चौदा वर्षाची दहा मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व

व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व माहिती अधिकार अधिनियम मधील कलम ७ (९) नुसार अशा माहितीचा अर्ज रद्द ठरविता येतो कारण अपिलार्थी यांनी विस्तृत व मोठ्या कालावधीची माहिती मागितल्यामुळे ही माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागणार आहे व ही बाब अपेक्षित नाही. केंद्रीय माहिती आयोगाने अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेतलेले आहेत. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी शक्य होईल तेवढी माहिती अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

आयोगाने सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहितीची संचिका आयोगासमोर अपिलार्थीस दिली अपिलार्थीने ती स्विकारली. अपिलार्थी यांना या माहितीची पाहणी करून त्यामध्ये त्यांना जी माहिती अपूर्ण वाटते ती जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. त्याचप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहितीकरिता आजपर्यंत झालेल्या खर्चाचा हिशोब द्यावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीकरिता आजपर्यंत झालेल्या खर्चाचा हिशोब द्यावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लिगाडे ओमशिवा विश्वनाथ, 'मुक्ताई निवास', साईप्रेम अपार्टमेंटच्या पश्चिमेस, विशालनगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक (अधीक्षक), शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवराज बाबय्या स्वामी, : अपिलार्थी
मातोश्री निवास, ४६३, बोधेनगर, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हा समादेशक, होमगार्ड, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा समादेशक, होमगार्ड, लातूर

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०१२
२ सुनावणीची तारीख दि. ११-०८-२०११
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी - श्री. शिवराज बाबय्या स्वामी : उपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक, होमगार्ड, लातूर
- श्री. डी. एन. नितनवरे
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १२-०१-२०१०
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. १५-०२-२०१०
६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. ०८-०३-२०१०
७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १६-०४-२०१०
८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातील तफावत व विलंबामुळे कमी मिळालेल्या रकमेबाबत दिनांक १२-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक, होमगार्ड, लातूर यांनी दिनांक १५-०२-२०१० रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे असे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समादेशक, होमगार्ड, लातूर यांनी दिनांक ०९-०४-२०१० रोजी सुनावणी घेऊन दिनांक १६-०४-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, सदरील प्रकरणी अर्जदाराकडून वसूली करण्यात आली त्याबाबत त्यांना अधिकृतरित्या कार्यालयीन आदेश काढून काहीही कळविण्यात आलेले नव्हते त्यामुळे याबाबतची सद्यस्थिती त्यांना आता स्वतंत्ररित्या पत्राव्दारे कळवावी व अपील निकाली काढले आहे. पुढे असेही दिसून येत आहे की, अपिलार्थीस या बरहुकूम दिनांक १९-०४-२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. आयोगापुढे केलेला युक्तिवादामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाल्याची बाब मान्य केली. तथापि त्यांना त्यांच्या वेतनातील तफावतीची रक्कम मिळवून देण्याची विनंती केली. सदर बाब ही प्रशासकीय बाब आहे त्याकरिता त्यांना संबंधित विभागाकडे पाठपुरावा करावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवराज बाबय्या स्वामी, मातोश्री निवास, ४६३, बोधेनगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक, होमगार्ड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रमाकांत प्रभाकर मोठे,<br>मु. पो. शिवणखेड (बु.), तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रमाकांत प्रभाकर मोठे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर - शिवनदास शिवाजी निरंजन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २२-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ कामगार तलाठी श्री. भास्कर कुलकर्णी यांच्यासंदर्भात एकूण सहा मुद्दयावर माहिती मागितली आहे. दिनांक ०९-०३-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती जी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध व देय होत आहे ती पाठविली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात त्यांना माहिती मिळाली आहे हे मान्य केले तथापि मिळालेली माहिती अपूर्ण व उशिरा मिळाली आहे असे आयोगास सांगितले.

आयोगापुढील कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, वडवळ (ना), तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी नमूद केले की, अपिलार्थीस विहित मुदतीत दिनांक १५-०३-२०१० रोजी तलाठी कार्यालयात ७/१२ घेण्यासाठी आल्यानंतर सदरची माहिती घेऊन जाण्याचे सांगितले तेव्हा अपिलार्थीने सदरची माहिती पोस्टाने पाठविण्यास सांगितले व दिनांक २३-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाने अपिलार्थीस माहिती पाठविली आहे अशी नोंद जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयात घेतली आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली आहे असे दिसून येत असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) नुसार शास्ती लावण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्याच प्रमाणे अपिलार्थी यांना मुद्दा क्रमांक १, ३ व ५ ची माहिती प्राप्त झाली. तथापि मुद्दा क्रमांक २, ४ व ६ ची माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगास अवगत केले. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्रमांक दोन बाबतच्या माहितीची एक प्रत उपलब्ध आहे ती अपिलार्थीस देण्यात आली व ती अपिलार्थीने स्विकारली व मुद्दा क्रमांक ४ व ६ मधील माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) अन्वये देय होत नाही. .

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमाकांत प्रभाकर मोठे, मु. पो. शिवणखेड (बु.), तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पटनुरे संतोष नागोराव, : अपिलार्थी
खाडगाव रोड, संभाजी नगर, वाले इंग्लिश स्कुलच्या
पश्चिमेला, चव्हाण टेलर यांचे घर, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०१४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पटनुरे संतोष नागोराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. पाटील बी. एस., कक्ष अधिकारी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १४-०८-२००९ च्या माहिती अर्जान्वये सन २००७ ते २००८ या वर्षात लातूर तालुक्यात दलित वस्ती सुधार योजनेच्या माध्यमातून कोणकोणत्या योजनावर किती निधी खर्च करण्यात आला इत्यादीबाबतची माहिती मागितली आहे. याचप्रमाणे सिमेंट रस्ते करण्यात आले आहेत अशा पध्दतीचे काम किती वर्षापर्यंत टिकून राहिले पाहिजे अशी मोघमपणे माहिती विचारली आहे. दलित वस्ती सुधार योजनेची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०९-२००९ च्या पत्राने अपिलार्थीस पाठविली आहे व सिमेंट रस्ते किती वर्षे टिकून राहतील याबाबतची माहिती उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग लातूर यांच्याकडून घ्यावी असे कळविले आहे. तथापि उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लातूर यांनी दिनांक १२-१०-२००९ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना सदर कामे आपल्या स्तरावरुन झाल्यामुळे त्या कामाची तांत्रिकदृष्ट्या पाहणी करण्याकरिता सदर कामाची मोजमाप पुस्तिका व संचिका या उपविभागास पाठवाव्या म्हणजे त्या अनुषंगाने सदर कामाचा तांत्रिक अहवाल देणे सोईस्कर होईल असे कळविले आहे.

अपिलार्थी यांनी बाकीची माहिती मिळाल्याचे सुनावणीच्या वेळी मान्य केले आहे तथापि त्यांना सिमेंट रस्ते व नाली याच्या आयुष्यमानाच्या बाबत माहिती मिळाली नाही असे आयोगास सांगितले. सिमेंट रस्त्याचे आयुष्यमान हे विविध कारणावर व संकल्पचित्रावर अवलंबून असते. यावर आकडेवारीशिवाय तसेच शास्त्रोक्त पध्दतीने निष्कर्ष काढल्याशिवाय भाष्य करणे शक्य नसते. त्यामुळे ही माहिती माहिती अधिकार अधिनियम तरतुदीमध्ये येत नाही, असे आयोगाचे मत आहे. याकरिता ही महिती देय होणार नाही. या स्तरावर अपिलार्थी यांना सिंमेट रस्ते वगळता बाकी सर्व माहिती मिळाली असल्याने प्रकरण या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०८-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पटनुरे संतोष नागोराव, खाडगाव रोड, संभाजी नगर, वाले इंग्लिश स्कुलच्या पश्चिमेला, चव्हाण टेलर यांचे घर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ. रशिदसाब,<br>छोटी मस्जिद जवळ, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,<br>पानचक्की, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,<br>पानचक्की, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,<br>पानचक्की, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ. रशिदसाब, छोटी मस्जिद जवळ, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, : अपिलार्थी
ॲड अंगद गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी,
नांदेड रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०१६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजयभाऊ जयराम कांबळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर,<br>तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर - प्रतिनिधी - श्री. डी. एन. शिंदे, नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०९-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी लातूर लोकसभा निवडणूक आणि २३६ - अहमदपूर विधानसभा निवडणूक २००९ या दोन निवडणुका दरम्यान अहमदपूर निवडणूक विभागामार्फत झालेल्या सर्व खर्चाची माहिती मागितली आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. प्रथम अपील सुनावणी होणे आवश्यक आहे.

माहितीचा अर्ज निवडणूक संदर्भात आहे त्यामुळे अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून राज्य माहिती आयोग निश्चित करीत आहे. अपर जिल्हाधिकारी, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन आदेश पारीत करावेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, ॲड अंगद गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कदम अरविंद वसंतराव,<br>रा.नळेगाव, ता.चाकूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिवजागृती महाविद्यालय,नळेगाव, ता.चाकूर, जि.लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव,ता.चाकूर, जि.लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कदम अरविंद वसंतराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्य लिपीक, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव, ता.चाकूर, जि.लातूर - श्री. गौंड सातलिंग काशिनाथ | : | उपस्थित |
| ३.३ | प्राचार्य, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव, ता.चाकूर, जि.लातूर- डॉ. संजय ज्ञानोबा वाघमारे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, सदरच्या महाविद्यालयास पूर्ण अनुदान २००६ पासून सुरु झाले. त्यापूर्वी ते विनाअनुदानित होते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे विस्तृत माहिती मागितली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी करुन फक्त स्वतःशी संबंधित माहिती अपेक्षित असल्याचे सांगितले. त्यांच्या युक्तिवादात त्यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांना वेतन देण्यात आले नाही. तसेच या बाबतच्या पे-शीटवर त्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या आहेत. तथापि त्यांना प्रत्यक्ष वेतन मिळालेले नाही. याकरिता ते माहिती मागत आहेत. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सुनावणी घेतल्याचे दिसून येत आहे. तथापि या प्रकरणात शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांनी लक्ष घालून अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर पुन्हा सुनावणी घेऊन विनाअनुदानित/अनुदानित संस्थांसंदर्भात उच्च न्यायालयाचे निर्णय इ.चा साकल्याने विचार करुन निर्णय देणे आवश्यक ठरत आहे. जन अपिलीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कामकाजाची संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्यांवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.याकरिता या आदेशाद्वारे शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांच्याकडे प्रकरण सुनावणीसाठी पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.२६.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कदम अरविंद वसंतराव, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव, ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव, ता.चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. प्राचार्य, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव, ता.चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महेश सूर्यकांतराव ढवळे, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०१८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लातूर - श्री. रुपनर बी.के. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी लातूर तालुक्याची रॉकेल वितरणासंदर्भात एकूण १९ मुद्यांवर माहिती मागितली आहे. अपिलार्थीस ही

माहिती दि. ३१.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लातूर यांच्याकडे माहिती मुदतीत प्राप्त झाली नाही. म्हणून अपील केले आहे. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती एकत्रित करण्यास विलंब होत आहे. याची नोंद घेऊन जास्त विलंब न होता विनामूल्य माहिती द्यावी, असा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०५.२०१० रोजी माहिती दिली. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलामध्ये प्रथम अपिलाची सुनावणीची प्रत मिळाली नाही, असे कळविले आहे व माहिती विहित मुदतीत मिळाली नाही, असे नमूद केले आहे.आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. यामध्ये काही माहिती अपूर्ण आढळल्यास त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत कळवावे लागेल. तदनंतर पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन जन माहिती अधिकारी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ११-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महेश सुर्यकांतराव ढवळे, वॉरियर ग्रुप संपर्क कार्यालय, हिरास कॉम्प्लेक्स, कापड लाईन, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेषेराव शिवाजी कच्छवे, : अपिलार्थी
रा. कोकणंगा, ता.अहमदपूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय,अहमदपूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय,लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०१९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाही. त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेषराव शिवाजी कच्छवे,मु.कोकणगंगा, पो. ता. अहमदपूर, जि.लातूर-४१३ ५१५

२. जन माहिती अधिकारी, तहसीलदार, तहसील कार्यालय,अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुसभागे शिरीष संदीपान, : अपिलार्थी
रा. लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसील कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२० | | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, औसा यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.

०२.१२.२०१० रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देण्यास विलंब झालेला आहे. राज्य माहिती आयोग यांच्या कार्यालयाने पाठविलेल्या आज रोजीच्या सुनावणीची नोटीस दि. ०१.०८.२०११ रोजी प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस दि. ०७.०८.२०११ रोजी माहिती विनामूल्य दिलेली आहे. अपिलार्थीस माहिती मिळाली असून त्याबाबतची पोच त्यांनी दिलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचा द्वितीय अपील अर्ज दि. ०१.०२.२०११ रोजीचा आहे व त्यांना माहिती दि. ०७.०८.२०११ रोजी मिळाली आहे. यामध्ये काही माहिती अपूर्ण वाटत असल्यास अपिलार्थीने पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे. पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी लागेल.

प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब केला आहे. भविष्यात अशाप्रकारे अधिनियमाद्वारे मागितलेली माहितीसंदर्भात कार्यवाही करण्यास विलंब होणार नाही, याकरिता दक्ष राहण्याची समज मुख्याधिकारी,नगर परिषद,औसा, जि.लातूर यांनी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना द्यावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

२) जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,औसा,जि.लातूर यांनी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत समज द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास अण्णाराव कुलकर्णी,कॉलन गल्ली, डॉ. आपटे यांच्या बाजूला औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय मुरलीधर मान्नीकर, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०३१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय मुरलीधर मान्नीकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - लेखा परीक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर - श्री. व्ही. के. आंबेसंगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे नगर परिषद,उदगीरच्या मालकी व ताब्यातील लिफ्टबाबतची

माहिती एकंदर ६ मुद्यांद्वारे मागितलेली आहे. ही माहिती त्यांना एकूण ९७ दिवस उशिराने प्राप्त झाली आहे व मिळालेली माहिती अपूर्ण आहे.

जन माहिती अधिकारी तथा लेखापरिक्षक,नगर परिषद, उदगीर यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, सदरची लिफ्ट व्यापारी संकुलाच्या विकासकाने बसविली आहे व त्याची देखभाल व दुरुस्ती संबंधित विकासकाकडेच असून याबाबत कसलाही करार करण्यात आलेला नाही.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ३०.०३.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये जी माहिती मागितली आहे, ती प्रश्नार्थक स्वरुपात आहे. तथापि सदरची लिफ्ट सार्वजनिक वापरासाठी असल्याकारणाने अपिलार्थी यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या मागे कोणती माहिती अभिप्रेत आहे, हे विचारात घेऊन कलम ७(१) नुसार विहित मुदतीत माहिती देणे आवश्यक होते. तशी कार्यवाही झालेली आढळून येत नाही. अपिलार्थी यांच्या युक्तिवादावरुन त्यांना खालील माहिती अभिप्रेत आहे, असे दिसून येत आहे.

१) लिफ्टबाबतचा तपशील- विशेषतः कंपनीचे नाव व कंपनीची आय. एस. आय. प्रमाणपत्राची कागदपत्रे.

२) सदरच्या लिफ्टची किंमत व बिलाची प्रत.

३) लिफ्टचा आकार व क्षमतेबाबतच्या तपशीलाची प्रत.

४) लिफ्टच्या देखभाल व दुरुस्तीसाठी केलेल्या करारनाम्याची प्रत.

५) लिफ्ट दुरुस्तीसाठी आतापर्यंत (दि.३०.०३.२०१० पर्यंत म्हणजेच अपिलार्थीच्या माहिती अर्जाची तारखेपर्यंतचा) झालेला खर्च

६) सदर लिफ्ट वापराचे लॉगबुक ठेवले असल्यास त्याची प्रत.

७) लिफ्ट बंद असल्याबाबतचा तपशील/कागदपत्र/अहवालाच्या प्रती

वरील माहिती उघड करण्यात सार्वजनिक हित निश्चित आहे. अपिलार्थीस सदरची माहिती देय होत आहे. याकरिता अपिलार्थीस उपरोक्त कागदपत्रे देताना संबंधित कंत्राटदाराशी बी.ओ.टी. तत्त्वावर केलेला करारनामा ज्यामध्ये लिफ्टबाबतचा ऊहापोह आहे, त्याची प्रत द्यावी लागेल.

प्रकरणात जन माहिती अधिकारी तसेच उपरोक्त माहिती नगर परिषदेमधील ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे उपलब्ध असते, त्यांच्याकडून माहिती अपिलार्थीस देण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील अटी व नियमांचे पालन करण्यात कसूर केली आहे, असे आयोगास आढळून येत आहे. याद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २०(१) अन्वये ₹ २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत,असे आयोगाचे मत झाले आहे व त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल. या आदेशाची

प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा लेखा परीक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना तामिल होईल, असे मुख्याधिकारी, नगर परिषद,उदगीर,जि.लातूर यांना पहावे लागेल.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा लेखा परीक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना एकत्रित ₹२५,०००/-शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे इतर तत्कालीन सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर या आदेशाची प्रत तामिल करावयाची जबाबदारी मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांची राहील.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय मुरलीधर मान्नीकर, नवी आबादी, कोर्टाच्या मागे, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा लेखा परीक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सावंत शिवाजी शेषेराव,<br>रा.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, सरस्वती माध्यमिक विद्यालय,लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा),जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/३३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सावंत शिवाजी शेषेराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, सरस्वती माध्यमिक विद्यालय,लातूर- श्री.चंद्रकांत काशीनाथराव साळुंके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा),जिल्हा परिषद, लातूर- प्रतिनिधी - श्री. आर.जी.आत्राम,कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ व्यक्तींची माहिती मागितलेली आहे. कलम ११ नुसार ही बाब त्रयस्थांच्या नजरेस आणून त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. ही बाब जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी विचारात घेतल्याचे दिसून येत नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी पुन्हा सुनावणी घेणे आवश्यक ठरत आहे. त्रयस्थ पक्षास त्यांना बाजू मांडण्याची संधी देण्यात येऊन त्यानंतर व्यापक जनहिताच्या कसोटीवर माहिती देणे योग्य होत असेल तर त्या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेणे आवश्यक ठरत आहे. या प्रकरणी मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी दिसत आहेत.

या सर्व बाबी पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर पुन्हा सुनावणी घेऊन अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन निर्णय पारित करावा लागेल.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.१५.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २३-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सावंत शिवाजी शेषराव, तावरजा कॉलनी,बादाडेनगर, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरस्वती माध्यमिक विद्यालय, प्रकाशनगर,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नंदकुमार गोविंदराव पेन्सलवार, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नंदकुमार गोविंदराव पेन्सलवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, लातूर- प्रतिनिधी - श्री. पी.व्ही. नवसारे, उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जि.लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.१०.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.११.२०१० (फेरसादर,दि.०९.०२.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १०.०५.२००२ ते १९.०६.२००२ या कालावधीचे त्यांच्या निलंबन कालावधीची फाईल पोलीस प्रशिक्षण विद्यालय,बाभळगाव यांच्या कार्यालयाकडे ज्या पत्राद्वारे पाठविली आहे, त्या पत्राची झेरॉक्स प्रत माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ११.१०.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, सदरची फाईल पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून पोलीस प्रशिक्षण विद्यालय,बाभळगाव यांच्या कार्यालयाकडे ज्या जावक क्रमांक व दिनांकान्वये पाठविलेली आहे, याची माहिती अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत देण्यात यावी.

अपिलार्थीने युक्तिवादात आयोगास सांगितले आहे की, त्यांची संदर्भित फाईल सन २००५-०६ मध्ये पाठविली असावी.

या सर्व बाबी विचारात घेता पोलीस अधीक्षक, लातूर यांनी दोन कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार करुन त्यांच्याकडून उपरोक्त माहितीचा शोध घेण्यात यावा व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी माहिती देण्याची व्यवस्था करतील, असे पहावे, असे आयोगाचे निर्देश आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकुमार गोविंदराव पेन्सलवार,सदगुरु नगर, कालिका देवी मंदिराच्या पाठीमागे, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस अधीक्षक, लातूर यांना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महादेव सोमनाथ स्वामी, : अपिलार्थी
रा.अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०३७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकुन (आस्थापना), जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर - श्री. बिपीन एस. खुरुद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (आस्थापना), जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दि.

२९.११.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.०६.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३)अन्वये अपिलार्थी यांच्या अर्जाची छायाप्रत मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर, उपविभागीय अधिकारी,उदगीर यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे तदनंतर दिनांक ०२.१२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या अर्जामधील मुद्दा क्र.ब,क,ड,ई संदर्भातील माहिती व माहितीच्या प्रतीतील मुद्याची व तथ्याची संकलीत मांडणी असलेली माहिती संचिकेत उपलब्ध नाही,असेही कळविले आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांनी सुनावणी घेऊन दि. ११.०१.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत. त्यानुसार अपिलार्थीस दि. ०१.०३.२०११ रोजी कार्यालयात उपस्थित राहून संचिकेचे अवलोकन करावे व संचिकेतील आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पाहणी केल्यानंतर ₹२/- प्रतिपृष्ठ प्रमाणे शुल्काचा भरणा केल्यानंतर देण्यात येईल, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिलेला नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस पुन्हा एकदा उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस पुन्हा एकदा उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादेव सोमनाथ स्वामी,घर क्रं. एन-२८, महादेव गल्ली,अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन (आस्थापना), जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पंढरीनाथ गंगाराम पेद्यावाड, : अपिलार्थी
रा.नळगीर, ता.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३८९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पंढरीनाथ गंगाराम पेद्यावाड | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद- प्रतिनिधी- श्री.के. आर. शेवरे, कक्ष अधिकारी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, पूर्वी ते हैद्राबाद राज्यात बिदर विभागात शिक्षक म्हणून काम करत होते. त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी त्यांची सेवाविषयक माहिती एकूण ११ मुद्यांद्वारे मागितली आहे. जेणेकरुन त्यांना पेन्शन प्राप्त होऊ शकेल.

आज रोजी शिक्षणाधिकारी (प्रा.) तथा जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी हे सुमारे ८० वर्षे वयाचे ज्येष्ठ नागरिक,सेवानिवृत्त शिक्षक आहेत. याकरिता त्यांनी मागितलेली माहिती कशी उपलब्ध होऊ शकेल, याबाबत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. आयोगाचे निर्देश आहेत की, पुढील सुनावणीस विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना विशेष साक्षीसाठी पाचारण करण्यात यावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे. त्याचप्रमाणे विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी आयोगासमोर विशेष साक्षीकरिता व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंढरीनाथ गंगाराम पेद्यावाड, रा.नळगीर, ता.उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
आगार प्रमुख,
राज्य परिवहन महामंडळ, उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय
कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/०४२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, उदगीर, जि.लातूर - श्री. एस.पी.देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, लातूर - प्रतिनिधी - श्री. डी. एम. गायकवाड, विभागीय वाहतूक अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०७.२०१० (मुंबई कार्यालयाकडे प्राप्त) |

१८.०२.२०११
(औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, उदगीर, जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०८.०३.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ व्यक्तीसंदर्भात एकूण १६ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. माहितीचा कालावधी सन २०१०, १९९७ ते २००९ व १९९७ असा दिलेला आहे. माहिती विस्तृत असल्याकारणाने माहिती संकलीत करण्यास अंशतः कालावधी जास्त लागला व दि. १६.०४.२०१० रोजी अपिलार्थीस (एकूण ५३ पृष्ठे) माहिती दिलेली आहे.

प्रसंगावशात आयोगास असे अवगत करण्यात आले की, अपिलार्थी हे त्यांच्या प्राधिकरणामध्ये चालक या पदावर कार्यरत होते व त्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे. तथापि मुद्दा क्र. १४ व १५ शी संबंधित माहिती त्यांना मिळाली नाही, असे नमूद केले आहे व मुद्दा क्र. १४ व १५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे यापूर्वीच दि. १६.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. यावरुन अपिलार्थीस देय असलेली व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध सर्व माहिती देण्यात आल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, शिवगण निवास, सत्ताने निवाससमोर, बिदर रोड, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देविदास रामराव गायकवाड, : अपिलार्थी
श्री. मावूली, दत्तमंदिर मागे, जुना औसा रोड, ड्रायव्हर कॉलनी, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. आर. व्ही. पाटणकर, लिपिक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३-०७-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०९-२०१०<br>फेरसादर दिनांक<br>२०-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास असे दिसून येते की,अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ पोलीस पाटील यांच्या नेमणुक व मुदतवाढी-संबंधी माहिती मागितली आहे. सदरची माहिती मिळण्याकरिता एकूण ३३ रुपये शुल्काचा भरणा करावा असे अपिलार्थीस विहित मुदतीत दिनांक २९-०६-२०१० रोजी कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे अपिलार्थी यांनी केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०७-२०१० रोजी निर्णय दिला आहे अर्जदार यांना जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती नियमानुसार देण्यात यावी. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्याचे आढळून येत नाही तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०८-२०१० रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पाठविल्याचे नोंदणीकृत टपालाच्या पावतीवरुन दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे या निष्कर्षा-प्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड, श्री. मावूली, दत्तमंदिर मागे, जुना औसा रोड, ड्रायव्हर

कॉलनी, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अनंत गोविंदराव पारसेवार,<br>गोविंद राज प्रेस, रेल्वेस्टेशन जवळ, उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर - श्री. क्षीरसागर व्ही. व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०३-२०१० च्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१ जानेवारी २००९ ते २८ फेब्रुवारी २०१० या कालावधीतील उदगीर शहर व तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानाबाबतची माहिती मागितली आहे. माहिती संकलीत करण्यासाठी काही कालावधी लागला. त्यानंतर माहिती अपिलार्थीस दिनांक २७-०५-२०११ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थीने त्याची पोच दिली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर यांना दिलेले दिनांक २७-०५-२०११ चे पत्र आयोगापुढे आहे. त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, दिनांक ०३-०३-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली आहे व त्याची पोहोच देण्यात येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, गोविंद राज प्रेस, रेल्वेस्टेशन जवळ, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बस्वराज गुरुलिंगप्पा उटगे, : अपिलार्थी
महाराज गल्ली, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बस्वराज गुरुलिंगप्पा उटगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड<br>- श्री. यु. डी. मोळवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०७-२०१०<br>फेरसादर दिनांक<br>२३-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २८-०३-२०१० च्या माहिती अर्जान्वये एकूण आठ मुद्दयावर जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांच्याकडून माहिती मागितली आहे. अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०५-०४-२०१० रोजी प्राप्त झाला. दिनांक १५-०४-२०१० रोजी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ४ व ६ वगळता इतर मुद्दयाची माहिती देण्यात आलेली आहे. मुद्दा क्रमांक ४ ची माहिती चौकशी सुरु असल्यामुळे कलम ८ (१) (जी) व (जे) प्रमाणे नाकारलेली आहे. तसेच मुद्दा क्रमांक ६ मधील उप कलम ३ ची माहिती उपलब्ध नसल्याने देण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांच्याकडे दिनांक २८-०४-२०१० रोजी प्रथम अपील केले. त्यावर दिनांक २०-०५-२०१० रोजी निर्णय देण्यात आला आहे. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १, २, ३, ५, ७ व ८ ची माहिती दिलेली आहे. मुद्दा क्रमांक ४ व ६ ची माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (जी) (जे) नुसार नाकारली आहे. या निर्णयाशी सहमत होऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांनी दिलेल्या प्रथम अपील निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बस्वराज गुरुलिंगप्पा उटगे, महाराज गल्ली, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार,<br>रा. बेलसकरगा, पो. मोघा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक, निलंगा, जिल्हा लातूर<br>- श्री. पी. व्ही. नवसारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, निलंगा, जिल्हा लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती पुरविण्यासाठी रुपये ३८ इतक्या शुल्काचा भरणा केल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती दिनांक २५-०८-२०१० रोजी देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे व प्रथम अपिलावर निर्णय झालेला नाही असे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांनी सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार, रा. बेलसकरगा, पो. मोघा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. किशन दादाराव तरटे, | : | अपिलार्थी |
| | रा. गुरधाळ, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | | |
| | ह. मु. संभाजी सोसायटी, कानमंदे यांच्या बाजूला, देगलूर रोड, उदगीर, जिल्हा लातूर | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर - प्रतिनिधी - श्री. पी. व्ही. नवसारे, उप पोलीस अधीक्षक, निलंगा, जिल्हा लातूर | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७-०८-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांनी सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशन दादाराव तरटे, रा. गुरधाळ, तालुका उदगीर, जिल्हा लातूर ह. मु. संभाजी सोसायटी, कानमंदे यांच्या बाजूला, देगलूर रोड, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागरगोजे बळीराम सोपान, : अपिलार्थी
मु. रामवाडी, पो. महाळंगी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नागरगोजे बळीराम सोपान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागरगोजे बळीराम सोपान, मु. रामवाडी, पो. महाळंगी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बेंबडे गोविंदराव गणपती,<br>मु. इस्मालपूर, पो. कल्लूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर,<br>जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बेंबडे गोविंदराव गणपती | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इस्मालपूर,<br>तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्रीमती ए. एस. पौळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर,<br>जिल्हा लातूर - श्री. यु. एम. केंद्रे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ३०-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये सन १९९० पासून दिनांक ३०-०६-२०१० पर्यंत इस्मालपूर ग्रामपंचायतीला शासनाकडून किती निधी आला व किती खर्च कोणत्या कामावर झाला अशी वीस वर्ष कालावधीची विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थीने हा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांना केलेला आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांनी सदर माहितीचा अर्ज दिनांक ०३-०७-२०१० रोजी ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इस्मालपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांच्याकडे कलम ६ (३) अन्वये वर्ग केला व ही बाब अपिलार्थीस कळविली आहे. माहितीची व्याप्ती विस्तृत असल्यामुळे ती संकलीत करण्यासाठी कालावधी लागला असल्याचे दिसून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी वीस वर्षापैकी काही वर्षे वगळता बाकी सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस ती देण्यात आली व उर्वरीत वर्षाबाबतच्या माहितीची अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहणी करावी असे सर्वानुमते ठरले. जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरीत माहितीचे सर्व अभिलेखे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बेंबडे गोविंदराव गणपती, मु. इस्मालपूर, पो. कल्लूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इस्लामपूर, पो. कल्लूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बस्वराज मल्लिकार्जुन बिरादार, : अपिलार्थी
रा. नेकनाळ, पो. तळेगाव (मो.), तालुका देवणी,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नेकनाळ,
तालुका देवणी, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी,
जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नेकनाळ,<br>तालुका देवणी, जिल्हा लातूर - श्री. बब्रुवान त्र्यं. पाटील | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी,<br>जिल्हा लातूर - श्री. मांदळे ए. व्ही. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-१०-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-१२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १३-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये २००७ ते दिनांक १३-०९-२०१० या कालावधीची भारत निर्माण योजनेअंतर्गत विविध माहिती सहा मुद्दयावर मागितली आहे. सदरचा माहितीचा अर्ज दिनांक १६-०९-२०१० रोजी जन माहिती अधिका-यास प्राप्त झाला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-१०-२०१० रोजी विहित मुदतीत कळविले की सदर माहितीमध्ये ६० पृष्ठे छायांकीत प्रती असून प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे रुपये १२० इतक्या रकमेचा भरणा करावा व माहिती कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावी. कारण अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर त्यांनी सुनावणी घेतली व दिनांक २५-११-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना मुद्दा क्रमांक १ ते ४ ची माहिती विनामूल्य देण्यात आली व उर्वरीत माहिती त्वरीत देण्यात यावी. दिनांक ०२-१२-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली आहे त्याची पोच अपिलार्थीने दिलेली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती देण्यात आल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बस्वराज मल्लिकार्जुन बिरादार, रा. नेकनाळ, पो. तळेगाव (मो.), तालुका देवणी, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नेकनाळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजीवकुमार पंढरी गायकवाड,<br>रा. जोगाळा, पो. लक्कडजवळगा, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जोगाळा, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजीवकुमार पंढरी गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जोगाळा, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर - श्री. पिराजी महादा कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर - श्री. पोतदार बालाजी जनार्धनराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१-०९-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०४-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १३-०७-२०१० च्या माहिती अर्जान्वये ग्रामस्वच्छता अभियानाबाबत २००५ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतची मौजे जोगाळा, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर येथील माहिती मागितली आहे. पाच वर्षाची माहिती असल्याकारणाने ही माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला व दिनांक २०-१०२०१० रोजी ही माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. अपिलार्थीने ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली तथापि अपिलार्थी यांनी मुद्दा क्रमांक ५ व ६ ची माहिती प्राप्त झाली नाही असे आयोगास अवगत केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक ५ व ६ ची माहिती (६६ झेरॉक्स प्रती) त्यांच्याबरोबर आणल्या आहेत असे आयोगास अवगत केले. आयोगाच्या सूचनेनुसार त्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्या व अपिलार्थीने त्या स्विकारल्या. अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या माहितीची पाहणी करावी व त्यात काही माहिती अपूर्ण असल्यास ही बाब जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत माहिती पुरविण्याची दक्षता घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजीवकुमार पंढरी गायकवाड, रा. जोगाळा, पो. लक्कडजवळगा, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जोगाळा, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बोधले गणेश शिवाजीराव, : अपिलार्थी
शिल्प निदेशक, आय. टी. आय. औसा, तालुका औसा,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ लिपिक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा,<br>जिल्हा लातूर श्री. डी. टी. आगवाणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २४-०८-२००९ च्या माहिती अर्जान्वये शासकीय तंत्र प्रशाला औसा, जिल्हा लातूर येथे खरेदी केलेल्या साहित्याबाबतची विविध माहिती मागितली आहे. या माहितीकरिता रुपये १८२ इतक्या शुल्काचा भरणा कार्यालयात करावा असे दिनांक ३१-०८-२००९ रोजी अपिलार्थीस कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी या शुल्काचा भरणा केलेला नाही. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती घेणार असल्याचे त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात शिल्प निदेशक म्हणून कार्यरत आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विहित मुदतीत शुल्काचा भरणा करण्याकरिता कळविलेले आहे तथापि अपिलार्थीने प्रतिसाद दिलेला नाही. अतः सदरचे प्रकरण बंद करण्यात यावे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोधले गणेश शिवाजीराव, शिल्प निदेशक, आय. टी. आय. औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
धर्मादाय उपआयुक्त, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१११७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर - श्री. क्षीरसागर एन.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - धर्मादाय उपआयुक्त, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी राजा हुसेन एज्युकेशन ॲण्ड सोशल फौंडेशन चाकूर, जि. लातूर या संस्थेच्या नोंदणीचा प्रस्ताव नाकारला

असल्यामुळे त्यासंदर्भात नाकारण्यासाठी बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, संस्था अधिनियमातील कोणकोणते नियम,अधिनियम,तरतुदींचा आधार घेण्यात आला,त्याच्या साक्षांकित प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.१०.२०१० रोजी प्रथम प्रतिसाद देऊन कळविले आहे की, राजा हुसेन एज्युकेशन ॲन्ड सोशल फौंडेशन,चाकूर या संस्थेची संचिका नाकारण्यात आली त्याची प्रत हवी असल्यास सरासरी ₹१०/- भरण्यात यावेत म्हणजे त्याची प्रत देण्यात येईल. सदरील नोंदणी नाकारण्यासाठी संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदींची पाहणी करावी, कारण या अधिनियमाच्या प्रती सार्वजनिकरित्या उपलब्ध आहेत. यानंतर अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपआयुक्त यांनी सुनावणी घेऊन दि. ०३.१२.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, त्यांच्या कार्यालयातर्फे दिलेले आदेश समन्यायिक स्वरुपाचे असून न्यायनिर्णय तथा आदेश कारणमिमांसेसह पारित केले जातात. त्याची प्रत अपिलार्थीस देय होत आहे. तथापि संस्था नोंदणी बाबतच्या न्यायनिर्णयातील व कारणमिमांसेमधील वैध अवैधतेच्या कारणांचा समावेश माहितीच्या व्याख्येत येत नाही, त्यामुळे देय होत नाही. यास्तव अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद, अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दे तसेच त्यांना देण्यात आलेली माहिती इत्यादीचा साकल्याने विचार करता, जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपआयुक्त, लातूर यांनी प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, नगर परिषद शाळा क्र.३२, बरकत नगर, लातूर-४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपआयुक्त, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आल्टे दत्तू निवृत्ती, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी,
नगर परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मालमत्ता व्यवस्थापक, नगर परिषद, लातूर -प्रतिनिधी - श्री.देशमुख एन.एम.,शाखा अभियंता | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०३.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, नगर परिषद, लातूर यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने दि. ०६.१०.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती दोन जन माहिती अधिकारी यांच्या कामकाजाशी संबंधित आहे. त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक यांनी अपिलार्थीस ०१.१२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले. तथापि अपूर्ण माहिती मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.११.२०१० रोजी अपिलार्थीस त्वरित माहिती द्यावी, असा निर्णय दिला. त्याबरहुकूम दि. ०१.१२.२०१० रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीचे द्वितीय अपील दि. १६.१२.२०१० रोजीचे आहे व त्यांना माहिती दि. ०२.१२.२०१० रोजी मिळाल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी दि. २५.०७.२०११ रोजी माहिती मिळाली आहे, अशी पोच दिल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आल्टे दत्तू निवृत्ती,रा. कपिलनगर, खाडगाव रोड, सैनिक पुरी, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भानप नवनीत सुमंतराव, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी,
राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय, मुंबई.
जन अपिलीय अधिकारी तथा
महाव्यवस्थापक (क.वऔ.स.),
राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय,मुंबई-८-प्रतिनिधी - श्री. एम.एस.बंड, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - महाव्यवस्थापक (क.व औ.स), रा.प.मध्यवर्ती कार्यालय,वाहतुक भवन,मुंबई-८ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भानप नवनीत सुमंतराव,विभागीय वाहतुक अधिकारी, द्वारा विभागीय कार्यालय राज्य परिवहन, अंबाजोगाई रोड, लातूर-४१३ ५३१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय,मुंबई-८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क.व औ.स), रा.प.मध्यवर्ती कार्यालय,वाहतुक भवन,मुंबई-८यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वंभर सोनाजीराव वराट, : अपिलार्थी
रा. भोकरंबा, ता. रेणापूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, वाशिम
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११२० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वाशिम- प्रतिनिधी - श्री. एस.एम.चव्हाण, अधीक्षक | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वाशिम | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ (त्यांच्या स्नुषा) यांच्या बदलीकरिता दि. ०४.१०.२००८ रोजी रितसर अर्ज केला होता. त्यावर काय कार्यवाही केली आहे, यासंदर्भात माहिती मागत आहेत असे दिसून येत आहे. यासंदर्भात त्यांनी अद्यापपावेतो माहिती दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा), जि.प.वाशिम यांना अपिलार्थीस त्यांनी केलेल्या अर्जासंदर्भातील सद्यपरिस्थिती त्वरित कळवावी लागेल. त्याचप्रमाणे सदरच्या माहितीसाठीच्या अर्जावर आजपर्यंत काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही ही गंभीर बाब आयोगाच्या नजरेस आली आहे. याकरिता शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.वाशिम यांना संबंधिताचा खुलासा मागवून त्यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे सद्यस्थितीची माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वाशिम यांनी प्रकरणात संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचा खुलासा मागवून योग्य ती प्रशासकीय कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वंभर सोनाजीराव वराट, रा. भोकरंबा, ता.रेणापूर, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वाशिम यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वाशिम यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ.रशिदसाब, : अपिलार्थी
रा.निलंगा, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद- श्री. एस.एन.जफर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण २ मुद्यांवर माहिती मागितली आहे. ती सर्व माहिती आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध आहे. ती संकलीत करण्यात आली असून नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात येत आहे, असे सुनावणीत सांगितले. अपिलार्थीस माहिती पाठविण्यास विलंब झालेला आहे, असे आढळून येत आहे. भविष्यात विलंब होणार नाही, यासाठी जन माहिती अधिकारी यांना दक्ष राहावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितल्याप्रमाणे अपिलार्थीस तात्काळ नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती विनामूल्य पाठवावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमान्वये प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही होईल, यासाठी भविष्यात दक्ष राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ.रशिदसाब, रा.छोटी मस्जिदजवळ,निलंगा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वक्फ अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मलंग अब्दुल रहमान मो.इस्माईल, : अपिलार्थी
रा.दबीरपूरा,उदगीर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती
प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२,लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११२२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०५.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे.त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहमान मो.इस्माईल,रा.दबीरपूरा,उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२,औसा रोड,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२,औसा रोड,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपिलार्थी
रा.टेंभुर्णी, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक संचालक, ग्रंथालय विभाग,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक संचालक,ग्रंथालय विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रंथालय निरीक्षक, ग्रंथालय विभाग, औरंगाबाद - श्री. प्र. के.सुर्यवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक ग्रंथालय संचालक, ग्रंथालय विभाग, औरंगाबाद- श्री. सु.रा.रोकडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा ग्रंथालय निरीक्षक, ग्रंथालय विभाग, औरंगाबाद यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण १९ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. यापैकी बहुतांश मुद्यांवर त्यांनी खुलासेवजा लेखी माहिती मागितली आहे व काही मुद्यांवर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली आहे. बऱ्याच मुद्यांवर माहिती कळविण्यात आलेली आहे. या सर्व बाबींमध्ये नेमकी कोणती माहिती द्यावयाची याची स्पष्टता नसल्यामुळे माहिती देणे शक्य झाले नाही. काही मुद्यांवरील माहिती (२६ पृष्ठे) त्यांच्याकडे उपलब्ध आहे. ते अपिलार्थीस देऊ शकतात. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना आतापर्यंत प्राप्त झालेली नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी विस्तृत अशी एकूण १९ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. यामध्ये जे मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपाचे आहेत त्यांच्यामध्ये खुलासे, स्पष्टीकरणे अथवा लेखी स्वरुपात माहिती मागितली आहे. जे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) नुसार माहितीच्या व्याख्येत बसत नसल्यामुळे देय होत नाहीत. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. १५,१६,१७ व १८ याबाबत माहिती देय होत नाही. तथापि मुद्दा क्र. ६ मधील दोन त्रयस्थ व्यक्तींची खाजगी स्वरुपाची माहिती वगळून शासकीय कामकाज करताना जी माहिती निर्माण झाली आहे, त्यासंदर्भात कागदपत्रे उपलब्ध असल्यास ती देय ठरत आहे. उदा. डॉ. आर.एस.बालेकर,सहायक ग्रंथालय संचालक,औरंगाबाद यांच्या सेवानिवृत्तीची तारीख व पेन्शन घेण्यापूर्वी धारण केलेले पद, सेवापटातील खाजगी बाबी वगळून अधिनियमातील कलम १० नुसार शासकीय कामकाजामध्ये निर्माण झालेल्या नोंदीच्या प्रती इ. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. १४ संदर्भातही शासकीय कामकाजामध्ये काही कागदपत्रे निर्माण झाली असल्यास त्याच्या प्रती देय होत आहेत. मुद्दा क्र. ११ मध्ये अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितली असल्यामुळे नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीने तसेच कलम ११ अनुसार त्रयस्थ पक्षाची बाजू ऐकून घेणे आवश्यक ठरत आहे. ती बाजू जन माहिती अधिकारी यांनी ऐकून घेऊन माहिती देणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास तसा निर्णय घ्यावा. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या उपरोक्त मुद्यांवर देय होत असलेली, त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली सर्व माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस पाठवावी व त्यानंतर पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थी यांना त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे आढळल्यास नेमके मुद्दे जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागतील व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची त्यांची विनंती आयोगास रास्त वाटत नाही. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे

निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही होईल, याची त्यांनी भविष्यात दक्षता घ्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य तात्काळ पाठवावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्यासाठी भविष्यात दक्ष राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, मु.टेंभुर्णी, पो.ता.अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रंथालय निरीक्षक, ग्रंथालय विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक, ग्रंथालय विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश दगडू होळे, : अपीलकर्ता
रा. लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव, उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अतिरिक्त सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर - श्री. दिलीप केशवराव सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर - श्री. समृत जनार्धनराव जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.

२५.०३.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीकरिता ₹६८/- इतक्या रकमेचा भरणा करुन माहिती घेऊन जावी, असे अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत दि. १९.०४.२०१० रोजी अपिलार्थीस कळविलेले आहे. अपिलार्थीने यासंदर्भात प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी यांना मागितलेल्या माहितीकरिता फीचा भरणा करुन माहिती घेऊन जाण्याचे कळविले असल्याची नोंद घेतली व अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यास माहिती तात्काळ उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय घेतला आहे. अपिलार्थी यांनी आतापर्यंत शुल्काचा भरणा केलेला नाही.

आयोगापुढे उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरुन, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता प्रयत्न केल्याचे दिसून येते. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. तथापि त्यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश दगडू होळे,रा.सुळ गल्ली, खडक हनुमान मंदिर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, : अपिलार्थी
रा. नांदगाव, ता. चाकूर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, चाकूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/११२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,चाकूर, जि.लातूर - श्री. डी.के. पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर - श्री. आर.बी.राहाणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १४.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित विविध प्रकारची विस्तृत स्वरुपातील माहिती मागितली आहे. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील आहेत, असे त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेले आहे. याकरिता त्यांच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतच्या प्रमाणपत्राबाबत त्यांच्या कार्यालयातर्फे गट विकास अधिकारी, चाकूर तसेच अपिलार्थी यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला. अपिलार्थीस दि. ३०.०९.२००९ रोजी दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र दाखल करण्याकरिता पत्र दिले आहे. त्यावर प्रतिसाद मिळालेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०९.१२.२००९ रोजी सुनावणी झाली. त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती (मुद्दा क्र. २ वगळता) अपिलार्थीस दारिद्रयरेषेखालील असल्याचे समजून माहिती देण्यात यावी, असा निर्णय झाला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध आहे, घेऊन जावी, असे अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीपूर्वीच दि. २६.११.२००९ रोजी कळविले असता, अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिलेला नाही.या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगाव, पो.गाजूर, ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख जावेद अ. सत्तार, : अपिलार्थी
रा.मानवत, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालयीन अधीक्षक,
नगर परिषद कार्यालय,मानवत,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. अपिलार्थी यांनी दि. ०८.०८.२०११ रोजी आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये त्यांनी रमजानचा कालावधी असल्याने सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही व सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली आहे.

त्यांची सदर विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जावेद अ.सत्तार, दै. औरंगाबाद विश्वमित्र मानवत तालुका कार्यालय,तकीय्या मोहल्ला, मानवत, ता.मानवत, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,नगर परिषद कार्यालय, मानवत,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बापुराव रामचंद्र मालुसरे,<br>सह शिक्षक, ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय, गुत्ती,<br>तालुका जळकोट, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०००८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बापुराव रामचंद्र मालुसरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. पी., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर - प्रतिनिधी - श्री. राम होनमाने, सहा. शिक्षण उपसंचालक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०८-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ०५-१०-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०१-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १९-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये विविध मुद्दयावर सन २००२ ते २०१० या कालावधीची माहिती मागितली आहे. सदरची माहिती मोघम व प्रश्नावली स्वरुपातील असल्यामुळे माहितीच्या व्याख्येत बसत नाही. तरी नेमकी कोणती माहिती पाहिजे त्या अभिलेख्या-चा निश्चित दिनांक लिहावा व नव्याने अर्ज करुन संबंधित शाळेकडून माहितीची मागणी करावी असे दिनांक १५-०७-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २८-०९-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नियम २ च मध्ये समाविष्ट माहितीसंदर्भात मागितलेली माहिती जुळत असेल तर तशी माहिती अपिलार्थीस विश्वासात घेऊन दिनांक १२-१०-२०१० पर्यंत विनामूल्य द्यावी तसेच जर २ च मधील माहितीच्या व्याख्येत बसत नसेल तर तसेही अपिलार्थीस कळवावे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना माहिती मिळालेली नाही. अपिलार्थीच्या माहिती अर्जाची आयोगापुढे चर्चा केल्यानंतर अपिलार्थीस खालील माहिती हवी आहे असे दिसून येत आहे.

१. सन २००२ पासून आजपर्यंत अपिलार्थी यांच्या वैयक्तीक मान्यतेचा प्रस्ताव संस्थेने / शाळेने शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठविला असल्यास त्याच्या प्रती.

२. सदरचा प्रस्ताव पाठविला नसल्यास न पाठविण्यामागील कारणमिमांसेची कार्यालयीन टिपणी असल्यास त्या टिपणीची प्रत.

३. शाळेने / संस्थेने शिक्षणाधिकारी यांच्याकडे उपरोक्त प्रस्ताव सादर केला असल्यास व तशी मान्यता दिली असल्यास त्याची प्रत.

४. अपिलार्थीस २००२ पासून आजपर्यंत संबंधित शाळेने वेतन दिले नाही. अपिलार्थी यांना २००२ पासून न्यायालयाच्या निर्णयानुसार २५ टक्के वेतन मिळाले आहे उर्वरीत वेतन शाळा / संस्था यांच्याकडून देण्यात आलेले नाही. तसे असल्यास जिल्हा परिषद / शासन यांच्याकडून हे वेतन देण्यात येते याबाबतचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी यांच्याकडे आला असल्यास त्याची प्रत व प्रस्ताव आला नसल्यास तसे कळविण्यात यावे.

५. एप्रिल २००९ ते जून २०१० पर्यंत शाळेने दाखल केलेल्या शिक्षक / कर्मचारी यांना अदा केलेल्या वेतन / पगारपत्रकाच्या प्रती.

वरील माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार देय होत आहे. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना सदरची माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी लागेल. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर यांना ही बाब व्यक्तिशः पहावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बापुराव रामचंद्र मालुसरे, सह शिक्षक, ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय, गुत्ती, तालुका जळकोट, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गुणवंतराव नामदेवराव मंगनाळे, : अपिलार्थी
मु. पो. श्रीनगर कॉलनी, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/००४७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर<br>- श्री. व्ही. के. आवेसंगे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर<br>- श्री. एस. टी. चव्हाण | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०१-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १४-०७-२०१० च्या माहिती अर्जान्वये संतोषीमातानगर नगर, उदगीर येथील घरांबाबत एकूण पाच मुद्दयावर माहिती मागितली आहे. यापैकी मुद्दा क्रमांक १ ची माहिती अपिलार्थीस दिनांक २६-०७-२०१० रोजी देण्यात आली आहे. मुद्दा क्रमांक २ ची माहिती मोघम स्वरुपात असल्यामुळे तपशील दिल्यास माहिती देणे सोईस्कर होईल असे दिनांक ०९-०८-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन ०२-१२-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, उर्वरीत मुद्दा क्रमांक ३, ४ व ५ ची माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात यावी. त्यानुसार दिनांक १५-१२-२०१० रोजी अपिलार्थीस उर्वरीत माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन अपिलार्थी यांनी त्यांना दिशाभूल करणारी, विसंगत व खोटी माहिती मिळाली असे मोघम नमूद केले आहे. तथापि नेमके नमूद केलेले नाही या सर्व बाबी विचारात घेता सदरचे प्रकरण या स्तरावर बंद करण्यात यावे या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुणवंतराव नामदेवराव मंगनाळे, मु. पो. श्रीनगर कॉलनी, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामलिंग करबसप्पा मळभागे, : अपिलार्थी
श्री निवास, आनंद नगर, आडत लाईन जवळ, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/००४९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामलिंग करबसप्पा मळभागे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.२), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर - श्री. एम. जी. कुलकर्णी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०१-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१-११-२०१० च्या माहिती अर्जान्वये मौजे जंगमवाडी (हेर) येथील सर्व्हे नंबर ३१६ मधील जमीन महादेव मंदिर देवस्थानाची आहे किंवा नाही याबाबतच्या पुराव्यासंदर्भात कागदपत्रे मागितली आहेत. ही कागदपत्रे दिनांक ०२-०८-२०११ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहेत. त्यामध्ये खालील कागदपत्राचा समावेश आहे.

१. खात्रा पत्रक १९५३-५४.

२. नकल कडपत्रक १३५२ फसली.

३. खासरा पत्रक (१९५३/५४)

४. पाहणी पत्रक (१९५५-१९६१)

५. शेतवार पत्रक (१३३० फसली)

६. नमुना नंबर ९ जमीनीचे पत्रक १३५८ फसली ७. जोडतक्ता अ १९६०.

अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे असे त्यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले. तथापि त्यांना माहिती उशीरा मिळाली असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थी यांना उपरोक्त कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी दिली आहे ती १३००/१४०० फसली या कालावधीची आहे. इतकी जुनी कागदपत्रे शोधण्यास निश्‍चित कालावधी लागेल. परंतु कागदपत्रे शोधून अपिलार्थीस देण्याची सकारात्मक भूमिका जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली आहे. त्यामुळे झालेला विलंब क्षमापित करण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामलिंग करबसप्पा मळभागे, श्री निवास, आनंद नगर, आडत लाईन जवळ, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.२), तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, : अपिलार्थी
ॲड गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय वन अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय वन अधिकारी, उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/००५६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजयभाऊ जयराम कांबळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वनपरिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर, मु. उस्मानाबाद<br>- श्री. अरुण गंगाधरराव पाटील | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय वन अधिकारी, उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद - श्री. सोपानराव मारोतराव पोकलवार | : उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी<br>- श्री. गुंडेराव शंकरराव सांबळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १०-०८-२०१० |

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. ०४-०८-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-०१-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २५-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्यांच्या कार्यक्षेत्रातील सहा मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०१-०७-२०१० रोजी प्राप्त झाला. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दोन जिल्ह्यातील सहा अधिका-यांशी संबधित होती. ही माहिती संकलीत करुन अपिलार्थीस दिनांक १०-०८-२०१० रोजी पोस्टाने पाठविली. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतला त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे की, उपलब्ध अभिलेख्यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास विनामूल्य माहिती दिलेली आहे. उर्वरीत माहिती अर्जदारास अपेक्षित असल्यामुळे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे तशी माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी तयार आहेत. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दहा दिवसात माहिती पुरवावी.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना माहिती उशीरा प्राप्त झाली व मिळालेली माहिती अपूर्ण आहे ती खालीलप्रमाणे आहे.

१. मुद्दा क्रमांक २ मधील उपस्थित मजुराची कामनिहाय माहिती (सतिलीकर यांच्या कालावधी-तील).

२. मुद्दा क्रमांक ५ मधील एका पासची किंमत, पासेसे देण्यात आलेली संख्या, किती रक्कम जमा करण्यात आली त्याची संख्या

३. मुद्दा क्रमांक ६ अंतर्गत भररी पथकामार्फत पडलेल्या धाडीच्या संदर्भामध्ये तपशीलवार यादी देण्यात यावी.

४. मुद्दा क्रमांक ७ अंतर्गत अवैध वृक्षतोड न होण्याबाबत शासन / विभागीय कार्यालय इत्यादींनी काढलेली परिपत्रके, आदेशाच्या प्रती.

वरील माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत आहे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थी यांनी त्यांना उशिराने माहिती प्राप्त झाली आहे असे नमूद केले आहे. तथापि ही माहिती दोन जिल्ह्यातील सहा अधिका-यांनी एकत्रित करुन द्यावयाची होती त्यामुळे लागलेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांचे करण योग्य वाटते. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी जे संबंधित

जन माहिती अधिकारी होते त्यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) नुसार वर्ग करणे आवश्यक होते. जन अपिलीय अधिकारी यांनी भविष्यात प्रथम अपिलावर निर्णय घेताना योग्य ऊहापोह करुन निर्णय देण्याची व्यवस्था करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपानाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, ॲड गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर, मु. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय वन अधिकारी, उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नंदवे तातेराव जगन्नाथ, : अपिलार्थी
रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,
जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हा परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११२६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,<br>जिल्हा लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. मुळे गोविंद शंकर, कक्ष अधिकारी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. पाटील बी. एस., कक्ष अधिकारी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०८-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये एकूण सहा मुद्दयावर सन २००५ ते २००९ या कालावधीतील विस्तृत माहिती मागितली आहे. सदरच्या माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) अन्वये माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपिलार्थीस दिनांक २९-०९-२००९ रोजी कळविण्यात आले आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेऊन दिनांक ११-१२-२००९ रोजी निदेश दिले आहेत की, माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ३, ४, ५ व ६ ची सन २००८ व २००९ ची माहिती एक आठवड्याच्या आत द्यावी. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रतिसाठी रुपये १६,९८४ इतका खर्च अपेक्षित आहे व इतके अनुदान त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने अपिलार्थी यांनी कार्यालयात उपस्थित राहून माहितीची पाहणी करावे असे दिनांक १४-१२-२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी दिनांक १७-१२-२००९ रोजी कार्यालयात उपस्थित राहून माहितीची पाहणी केली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी माहितीची पाहणी देण्याचा घेतलेला निर्णय योग्य वाटतो. तसेच जन माहिती अधिकारी अपिलार्थी यांना माहिती देण्याकरिता प्रयत्नशील होते असे आढळून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता सदरचे प्रकरण या स्तरावर बंद करण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २५-०८-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथ, रा. नांदगांव, त्पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गणेश दगडू होळे,<br>रा. सूळ गल्ली, खडक हनुमान मंदिर, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर - श्री. डी. एस. नरसाळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर - श्री. एस. जी. मुनगिलवार | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी, तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर - श्री. एस. एस. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १२.४.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक १.४.२००८ ते ७.४.२०१० या कालावधीची एम बी अंदाजपत्रक, दिलेल्या बिलाच्या छायांकित प्रती, तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीचा आदेश, क्वॉलीटी कंट्रोल अहवालाची प्रत, वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीची प्रत व मजूर संस्थेचे नांव इत्यादी. ९० कामांबाबतची विस्तृत माहिती मागितली आहे.त्यांनी दिनांक २९.४.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थिस माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने कार्यालयात उपस्थित राहून माहितीची पाहणी करावी असे कळविले आहे.तथापि अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिला नाही व दिनांक १७-०५-२०१०. रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले, त्यावर प्रथम सुनावणी दिनांक १५-०६-२०१० रोजी ठेवण्यात आली होती. परंतु सदरील सुनावणी त्या दिवशी झाली नाही. पुन्हा दुस-यांदा दिनांक २२-०६-२०१० रोजी सुनावणी ठेवण्यातआली होती. परंतु अपिलार्थिने सुनावणी होण्यापूर्वीच दिनांक ०९-०६-२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त खंडपीठ औरंगाबाद येथे अपील दाखल केले बाबत पत्र दिनांक १५-०६-२०१० रोजी दिले आहे. त्यामुळे पुढील सुनावणी झाली नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी ९० कामांची अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व माहिती अधिकार अधिनियम मधील कलम ७ (९) नुसार अशा माहितीचा अर्ज रद्द ठरविता येतो कारण अपिलार्थी यांनी विस्तृत व मोठ्या कालावधीची माहिती मागितल्यामुळे ही माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागणार आहे. केंद्रीय माहिती आयोगानेही प्रंसगी अशा माहितीचे अर्ज फेटाळ्ले आहेत. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी शक्य होईल तेवढी माहिती अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अपिलार्थीने त्यास प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे सदरचे व्दितीय अपील प्रकरण बंद करण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश दगडू होळे, रा. सूळ गल्ली, खडक हनुमान मंदिर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी, तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, : अपिलार्थी
रेल्वेस्टेशन जवळ, उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११२८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर<br>- श्री. व्ही. के. आवेसंगे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर<br>- श्री. एस. टी. चव्हाण | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०१-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये सन १९७० ते मार्च २०१० अखेरपर्यंत नमुना नंबर ८ तसेच त्रयस्थ श्रीमती साबेरा बेगम मैनोद्दीन यांच्या सन १९८१-८२ सालातील संचिकेच्या प्रती व त्रयस्थाच्या नामांतराची संचिका इत्यादीचा तपशील मागितला आहे. माहिती १९७० सालापासून असल्यामुळे ती संकलीत करणे एका महिन्याच्या कालावधीत शक्य झाले नाही. माहिती संकलीत केल्यानंतर व जी उपलब्ध झाली ती दिनांक ११-०६-२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०१-०७-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये माहिती मिळाली आहे तथापि काही माहिती अपूर्ण आहे असे मोघमपणे नमूद केले आहे. याकरिता अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, रेल्वेस्टेशन जवळ, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, | : | अपिलार्थी |
| रा. टेंभुर्णी, पो. तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २४-०८-२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली आहे. त्यांची ही

विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, रा. टेंभुर्णी, पो. तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार, : अपिलार्थी
रा. बेलसकरगा, पो. मोघा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११३० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १४-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार, रा. बेलसकरगा, पो. मोघा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मलंग अब्दुल रहमान मो. इस्माईल, : अपिलार्थी
रा. दबीरपुरा, उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक ५, हदगांव, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक ५, हदगांव, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उपविभाग क्रमांक १३, हदगांव, जिल्हा नांदेड - श्री. अ. मा. बिजले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक ५, हदगांव, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-१०-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०७-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थाची माहिती मागितली आहे. सदरचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १२-०७-२०१० रोजी प्राप्त झाला. त्यानंतर माहितीकरिता रुपये २७ इतक्या शुल्काचा भरणा करावा असे अपिलार्थीस दिनांक ०४-०८-२०१० रोजी विहित मुदतीत कळविले आहे. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने मनीऑर्डरने केला ते शुल्क जन माहिती अधिकारी यांना दिनांक २१-०८-२०१० ला प्राप्त झाले. अपिलार्थीस दिनांक २५-१०-२०१० रोजी माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. याकरिता कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक ५, हदगांव, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीस उशिरा माहिती देण्यासाठी जबाबदार असणा-या संबंधित लिपिकास भविष्यात दक्ष राहण्याबाबत समज द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहमान मो. इस्माईल, रा. दबीरपुरा, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उपविभाग क्रमांक १३, हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक

५, हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. युवराज यशवंतराव इंगोले, : अपिलार्थी
रा. लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि
सहसंचालक,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक कृषि अधिकारी,
विभागीय कृषि सहसंचालक, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. युवराज यशवंतराव इंगोले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तंत्र अधिकारी, अधिनस्त विभागीय कृषि सहसंचालक, लातूर विभाग,लातूर - श्री.एस.जी. बीराजदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर - श्री. एस.एम.जमदाडे | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगास असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी जुलै,२००७ ते सप्टेंबर, २०१० या कालावधीची कंपार्टमेंट बंडींगविषयी एकूण दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. यासंदर्भात मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहितीची एकूण ४१ पृष्ठे अपिलार्थी यांना दि. २५.१०.२०१० रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहेत. मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थी यांनी स्पष्टीकरण अपेक्षित करणारी व खुलासेवजा माहिती मागितली आहे, त्यामुळे ती अपिलार्थीस देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस देण्यात आली नाही, असे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाल्याचे तथापि मुद्दा क्र. २ ची माहिती चुकीची मिळाली आहे, असे त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ०१.१२.२०१० रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी, अधिनिस्त विभागीय कृषि सहसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी दि. १४.१२.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. खुलासेवजा माहिती, माहिती अधिकार अधिनियमान्वये देणे अभिप्रेत नाही. ही बाब आयोगास योग्य वाटते. यास्तव सुनावणीच्या वेळी सर्वानुमते प्रकरण निकाली काढण्यात यावे, असे ठरले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड युवराज यशवंतराव इंगोले, रा. चाणक्य लॉ असोसिएटस्, कन्हेरी रोड, मोरेनगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, अधिनस्त विभागीय कृषि सहसंचालक, लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सूर्यवंशी भरतकुमार विठ्ठलराव,<br>रा.तळेगाव (दे), ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सूर्यवंशी भरतकुमार विठ्ठलराव | : | उपस्थित |
| ३.२ | सध्याचे जन माहिती अधिकारी - मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर - श्री. एस.एम.पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर - श्री. बी.टी.काळदाते | | |
| ३.४ | सध्याचे जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर- श्री. डी.बी.सुतार | : | उपस्थित |
| ३.५ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर- श्री. व्ही.व्ही.लहाने | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.११.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी दि. २६.१०.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये शेततळ्यासंदर्भात शिरुर अनंतपाळ तालुक्यामध्ये सन २००८-०९ व २००९-१० मध्ये झालेल्या कामाच्या विविध बाबीबाबत एकूण ५ मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहे. माहिती पुरविण्याकरिता एकूण ₹४०१४/- इतक्या रकमेचा भरणा करावा, असे अपिलार्थीस दि. १५.११.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २३.१२.२०१० रोजी सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास कलम ७(१) नुसार विहित मुदतीत शुल्क भरणा करण्याकरिता कळविले आहे व पोस्टाच्या पावतीसह सर्वांसमक्ष दाखविले आहे. यावर अपिलकर्त्याचे समाधान झाले आहे व यामुळे अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी तयार केली आहे व त्याप्रमाणे अपिलकर्त्याकडून शुल्क वसूल करुन माहिती देण्यात यावी, असा निर्णय देऊन अपील निकाली काढले आहे. अपिलार्थी यांनी ते व्यक्तिशः माहिती घेतील, असे त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केले आहे. तथापि त्यांनी शुल्क भरलेले आढळून येत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २५-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सूर्यवंशी भरतकुमार विठ्ठलराव,रा.तळेगाव (दे), ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती शोभा मनोहरराव गोमारे, : अपिलार्थी

रा. लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी,
नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर अभियंता, नगर परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. देशमुख एन.एम.शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.११.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेणे

आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. शोभा मनोहरराव गोमारे (दुड्डे), मंगेश सदन, नारायण नगर,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालाजी मोहनराव पाटील, : अपिलार्थी
रा. बाकली, ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बालाजी मोहनराव पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर- प्रतिनिधी - श्री. बी.आय.हासबे, अव्वल कारकुन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या दि. ०४.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन

निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०४.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी मोहनराव पाटील, मु.बाकली पो.अंकुलगा (राणी),ता.शिरुर अनंतपाळ,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(पुरवठा), तहसील कार्यालय,शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांना अपिलार्थीच्या या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रवि विरेंद्र सुडे,<br>रा. लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रमुख स्वच्छता निरीक्षक तथा अक्षय नागरी योजना प्रमुख, नगर परिषद, लातूर - प्रतिनिधी- श्री. देशमुख एन.एम.शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या दि. ०८.११.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.११.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रवि विरेंद्र सुडे,सहयाद्री कॉलनी, नाथनगर, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख स्वच्छता निरीक्षक तथा अक्षय नागरी योजना प्रमुख, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. धुमाळ ज्ञानू विठ्ठल, : अपिलार्थी
रा. येळी, ता. औसा, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
ग्रामपंचायत कार्यालय, येळी,
ता.औसा, जि.लातूर.
जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,औसा, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/००९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. धुमाळ ज्ञानू विठ्ठल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत,येळी, ता.औसा,जि.लातूर- श्रीमती बोंगाने वर्षा | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा,जि.लातूर - श्री. कदम पी.बी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात त्यांना माहिती प्राप्त झाली नाही असे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत येळी, ता.औसा,जि.लातूर यांनी अपिलार्थीस दि. २३.१२.२०१० रोजी माहिती दिल्याचे व त्यासंदर्भात पोच त्यांच्या अभिलेखात असल्याचे आयोगास सांगितले व अपिलार्थीस ही पोच समक्ष दाखविण्यात आली.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. धुमाळ ज्ञानू विठ्ठल, मु.येळी, पो.किनी(थोटे),ता.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,येळी, ता.औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राहुल राजेंद्र विहीरे,<br>रा. लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०१०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर अभियंता, नगर परिषद, लातूर- प्रतिनिधी - श्री. एन.एम.देशमुख, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.११.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ३१.०८.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये नगर परिषद फंड व रस्ते अनुदानातून देण्यात येणाऱ्या

रस्त्याच्या कामांसंदर्भात विविध मुद्यांवर माहिती मागितली. तसेच मोजमापपुस्तिकेच्या प्रती व इतर तपशीलही जसे जन माहिती अधिकारी यांचे पहाणी शेरे मागितले आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.०९.२०१० रोजी प्रथम प्रतिसाद देऊन कळविले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती संकलीत करण्याचे काम चालू आहे. संकलीत होताच देण्यात येईल.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. ०४.११.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना नेमकी कोणत्या विशिष्ट कामाची माहिती आवश्यक आहे हे स्पष्टपणे कळवावे व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी. अपिलार्थी यांनी यासंदर्भात प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि.०९.११.२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे की, कार्यालयात उपस्थित राहून प्रत्यक्ष संचिका पहावी व पाहणीनंतर संचिकेतील काही कागदपत्रांची आवश्यकता असल्यास ती कागदपत्रे विनामूल्य देण्यात येतील. अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही. तरी अपिलार्थीस माहितीचे अभिलेखे पाहणी करण्याकरिता पुन्हा एकदा अंतिम संधी देण्यात यावी. यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. राहुल राजेंद्र विहीरे, महाराष्ट्र हाऊसिंग सोसायटी, बार्शी रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कारनाळे नारायण नागनाथ, : अपिलार्थी
रा.उजना, ता.अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रमशाळा,
तुळशीरामतांडा, ता.अहमदपूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रमशाळा, तुळशीरामतांडा, ता.अहमदपूर, जि.लातूर - श्री. जाधव एस. जी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,लातूर -प्रतिनिधी - श्री. परोडवाड ए.टी.,कनिष्ठ लिपीक | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०१.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १२.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रमशाळा, तुळशीरामतांडा, ता.अहमदपूर, जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २७.०९.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये एकूण २७ मुद्यांवर सन २००१ ते ०५ या कालावधीची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी अशाप्रकारचे १२ अर्ज केले आहेत व वेगवेगळया अर्जान्वये एकसारखीच माहिती मागितली आहे. या प्रकरणातील माहिती अर्जासंदर्भात दि. ०१.११.२०१० रोजी अपिलार्थीस ही बाब कळविण्यात आली असून यापूर्वी या मुद्यांवर माहिती देण्यात आली आहे, असे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा विशेष समाजकल्याण अधिकारी, लातूर यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहितीचा एक संच देण्यात आला. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयानुसार पुन्हा एकदा दि. १४.१२.२०१० रोजी स्पीड पोस्टाने एकूण २८८ पृष्ठांची माहिती विनामूल्य पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या माहितीसाठीचा अर्ज पाहता, अपिलार्थीने विस्तृत अशी माहिती मागितलेली आहे. अशाप्रकारची माहिती एकत्रित करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळाचा मोठया प्रमाणावर वापर होत आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील मुख्य भूमिका सफल होत नाही व अर्ज अव्यवहार्य ठरत असल्यामुळे कलम ७(९) नुसार फेटाळण्यायोग्य ठरतो. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेऊन अपिलार्थीस माहिती दिलेली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कारनाळे नारायण नागनाथ, मु.उजना, पो.गंगाहिप्परगा, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रमशाळा, तुळशीरामतांडा, ता.अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पुंडलिक माधवराव बेंबडे, : अपिलार्थी
रा.बोरी, ता.जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, कमला नेहरु माध्यमिक व उच्च माध्यमिक
विद्यालय, बोरी, ता. जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, कमला नेहरु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरी, ता. जि.लातूर - प्रतिनिधी - श्री.सगरे जे.जी.सहशिक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. आत्राम आर.जी.,कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कमला नेहरु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरी, ता. जि.लातूर यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००० ते ऑगस्ट २०१० पर्यंतची कमला नेहरु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरी, ता. जि.लातूर या शाळेसंदर्भात विस्तृत माहिती मागितली आहे. ही माहिती जुनी असल्याकारणाने संकलीत करण्यात येत असून अपिलार्थीस देण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी विचारात घेता आयोगाचे असे मत आहे की, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कमला नेहरु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरी, ता. जि.लातूर यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. अपिलार्थीस यासंदर्भात नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २५-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुंडलिक माधवराव बेंबडे,रा.बोरी, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कमला नेहरु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरी, ता. जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दायमी सय्यद सुलेमान गुलाम रब्बानी, : अपिलार्थी
रा. लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा
पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/११९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दायमी सय्यद सुलेमान गुलाम रब्बानी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड - श्री. पुजरवाड बी.के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी दि. ०३.०९.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये पशुधन पर्यवेक्षक पदासाठी झालेल्या परीक्षेबाबत एकूण

चार मुद्यांवर माहिती मागितली आहे. तथापि यापैकी उत्तरपत्रिकेच्या प्रती त्यांना देण्यात आल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, उत्तरपत्रिकांच्या प्रती माहिती अधिकार अधिनियमान्वये देय होत नाहीत. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर झालेल्या सुनावणीच्या वेळी या बाबीची नोंद घेतली आहे व उर्वरित माहिती अपिलार्थीस देण्यात आली असल्याने अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.१२.२०१० रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांच्या उत्तरपत्रिकेच्या प्रती माहिती अधिकार अधिनियमातील कलम 8(1)(e) नुसार देय होत नाहीत. उर्वरित माहिती अपिलार्थीस पूर्वीच देण्यात आली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दायमी सय्यद सुलेमान गुलाम रब्बानी, द्वारा एस.एम.एच.दायमी, एम्प्लायमेंट ऑफीसजवळ, सलीम खिदमतसमोर, खोरी गल्ली, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.बालाजी विश्वनाथ बिरादार, : अपिलार्थी
रा.चवणहिप्परगा, ता.देवणी, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, लातूर -प्रतिनिधी - श्री. आर.जी.आत्राम, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १२.०४.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये लोक जागृती शिक्षण संस्था संचलित श्री जालनाथ महाराज विद्यालय, लासोना, ता.देवणी,जि.लातूर येथील शाळेला घेतलेल्या जागेबाबतची एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री जालनाथ महाराज विद्यालय,लासोना,ता.देवणी,जि.लातूर यांनी अपिलार्थीस दि. २५.११.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठविली आहे. यावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. तथापि विहित मुदतीनंतर मिळाल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जास अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत माहिती देण्याची जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री जालनाथ महाराज विद्यालय,लासोना,ता.देवणी,जि.लातूर यांना दक्षता घ्यावी , असे आयोगाचे निर्देश आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जास अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत माहिती देण्याची जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री जालनाथ महाराज विद्यालय,लासोना,ता.देवणी,जि.लातूर यांना दक्षता घ्यावी

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी विश्वनाथ बिरादार, रा.चवणहिप्परगा,ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रोडगे प्रभाकर किशनराव, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षण विभाग (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०२८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रोडगे प्रभाकर किशनराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूर - श्री. एस.आर.सानप | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १२.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगासमोर सादर करण्यात आलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांचा जन्म १९४२ चा असून ते ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या स्वत:च्या सेवेबाबतची माहिती मागितली असून ही माहिती सन १९७४-७५ सालची आहे. माहिती जुनी असल्यामुळे देता येऊ शकली नाही. काही माहिती देण्यात आली आहे, असे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही, असेही युक्तिवादात आढळले आहे. याकरिता आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या प्रत्येक मुद्यावर त्यांना देण्यात आलेली माहिती व ज्या दिवशी दिली त्याचा दिनांक व त्याची सद्यपरिस्थिती, याचे एक परिशिष्ट तयार करण्यात यावे व जी माहिती शोधूनही उपलब्ध होऊ शकली नाही, त्याबाबत मुद्देनिहाय दुसरे परिशिष्ट तयार करण्यात यावे व या माहितीशी संबंधित कागदपत्रांच्या प्रती अन्य कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील किंवा कसे, याबाबतही संशोधन करुन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती संकलीत करावी. ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.बीड यांनी व्यक्तिशः पहावी व वर नमूद केल्याप्रमाणे या सर्व माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे या निर्देशासह आयोगातर्फे प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रोडगे प्रभाकर किशनराव,रा.खाडगार रोड, साईधाम, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जनाबाई संजय व्यवहारे (काळे), : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, अणदूर,
ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,पंचायत समिती,
तुळजापूर,जि.उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १५.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. जनाबाई संजय व्यवहारे (काळे),रा. अणदूर,ह.मु.द्वारा किरण कुंज, हत्तेनगर,रोड क्र.२,लातूर-४१३५१२

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अणदूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चाँद बबर मुंडे, : अपिलार्थी
रा.चिंचोली (बु.), ता.जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय,
चिंचोली (ब), ता.जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, घर क्र. २८१ व ३४२ च्या फेरआकारणीबाबतची एकंदर ६ मुद्यांवर माहिती मागितली आहे. मागितलेल्या माहितीमध्ये बहुतांश माहिती १९७५ सालची आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चाँद बबर मुंडे, रा.चिंचोली (ब),ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय, चिंचोली (ब), ता.जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सोरेकर प्रताप शंकरराव,<br>रा.लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपकुलसचिव (अस्थापना),<br>मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी | : | उत्तरवादी |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०३१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकुलसचिव (अस्थापना), मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी- श्री. र.वि.जुक्टे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कुलसचिव,मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी - डॉ. बा.भ.भोसले | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | २८.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०३.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | ०१.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०७.२०१०<br>(फेरसादर,दि.२५.०८.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (अस्थापना),मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्याच विद्यापीठामध्ये कनिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत आहेत. दि. २९.०३.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये त्यांच्याविषयी दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे.सदरची माहिती कारणमिमांसा देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.०४.२०१० रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिलेला आहे व माहिती देण्यास असमर्थता दर्शविली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव यांनी दि. १७.०६.२०१० रोजी सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहिती दाखविण्यात आली. त्यावर अपिलार्थीचे समाधान झाले आहे, अशी नोंद जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णयात घेतली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांनी त्यांच्या बदलीच्या आदेशासंदर्भात कुलगुरु यांनी मंजूर केलेल्या टिपणीच्या प्रती मागितल्या आहेत यासंदर्भातील संपूर्ण माहितीच्या प्रती त्यांना देण्यात याव्यात. तथापि जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १७.०६.२०१० रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस उक्त माहिती पाहणी करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पाहणीनंतर अपिलार्थी यांचे समाधान झाले आहे, अशीही नोंद दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 2(j)1तरतुदीनुसार अभिलेखांची पाहणी येत आहे. त्याप्रमाणे ही पाहणी माहिती अपिलार्थीस यापूर्वीच देण्यात आली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोरेकर प्रताप शंकरराव, कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, नांदेड रोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (अस्थापना),मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव,मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महमद रहिमखा महमद दुलेखाँ, : अपिलार्थी

विकास नगर, देगलूर रोड मजिद जवळ, उदगीर,

तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, निडेबन,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर,
जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, निडेबन, तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्री. केंद्रे हानमंत मारुतीराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर, जिल्हा लातूर - श्री. केंद्रे उत्तम मारुतीराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०२-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २४-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये एकूण चौदा मुद्दयावर जानेवारी २००८ ते फेब्रुवारी २०१० या कालावधीची माहिती मागितली आहे. अपिलार्थी हे सेवानिवृत्त नायब तहसीलदार आहेत. काही माहिती त्यांनी तक्ता तयार करुन मागितली आहे. त्यात बरीचशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपात, खुलासेवजा मागितली आहे. सदरची माहिती एका महिन्यात देणे जन माहिती अधिकारी यांना अशक्यप्राय होते. त्यांच्या कार्यालयात फक्त एक लिपिक मदतीसाठी आहे. तरी सर्व माहिती संकलीत करुन तयार असल्याचे दिनांक २४-०५-२०१० रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थी आजारी असल्यामुळे माहिती घेऊन जाऊ शकले नाहीत. अपिलार्थी त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे व्यक्तिशः उपस्थित राहून माहिती घेणार होते. त्यानंतर अपिलार्थी यांनी २५-०६-२०११ रोजी उपस्थित राहून माहिती घेतलेली आहे व त्याची पोच दिलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विस्तृत प्रमाणात तीन वर्षे कालावधीची ब-याचशा मुद्यांवर लेखी स्वरुपात तक्त्यात माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीमध्ये जी माहिती उपलब्ध आहे ती अपिलार्थीस देता येते. लेखी स्वरुपात देणे, खुलासे, स्पष्टीकरण करणे अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियम कायद्यामागची भूमिका विचारात घेता इतक्या मोठ्या प्रमाणावर माहिती मागितल्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील साधनसामग्रीचा व मनुष्यबळाचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो त्यामुळे माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरण्याची शक्यता असते. या सर्व बाबी संबंधितांनी विचारात घेणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेऊन अपिलार्थी यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती संकलीत करुन पुरविलेली आहे त्यामुळे प्रकरण निकाली काढणे योग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महमद रहिमखा महमद दुलेखाँ, विकास नगर, देगलूर रोड मजिद जवळ, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, निडेबन, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रदिप तु. गंगणे, : अपिलार्थी
नटराज, कॉम्प्लेक्स, खांडगांव रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर रचनाकार, नगर परिषद कार्यालय, लातूर<br>- श्री. सतिश शिवणे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. प्रकरणात अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप तु. गंगणे, नटराज, कॉम्प्लेक्स, खांडगांव रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. माधव शंकरराव भिसे,<br>जान्हवी, रुद्रेश्वर मंदिर जवळ, विद्यानगर, एल. आय. सी. कॉलनी, रिंग रोड, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>आस्थापना विभाग, नगर परिषद कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>आस्थापना प्रमुख, नगर परिषद कार्यालय, लातूर<br>- श्री. मुजावर आय. पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २०-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या एका निर्णयासंदर्भात तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होती ती अपिलार्थीस दिनांक १२-१०-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थीस विहित मुदतीत पाठविण्यात आली आहे. त्यावर समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. त्यावर सुनावणी घेण्यात आली व निर्णय देण्यात आला. या संचिकेचा शोध घेऊन उर्वरीत माहिती अपिलार्थीस दिनांक २८-०७-२०११ रोजी देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तसेच त्यांचे व्दितीय अपील दिनांक ०४-०७-२०१० चे आहे. त्यांना माहिती दिनांक २८-०७-२०११ रोजी देण्यात आलेली आहे त्यामुळे अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. भविष्यात माहिती अर्जावरील माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देण्याबाबत सतर्क राहावे अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माधव शंकरराव भिसे, जान्हवी, रुद्रेश्वर मंदिर जवळ, विद्यानगर, एल. आय. सी. कॉलनी, रिंग रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा आस्थापना प्रमुख, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ओमशिवा विश्वनाथ लिगाडे, : अपिलार्थी
व्दारा, वसंतराव कदम, मातृवंदन, कोटलवार किराणा
दुकानाजवळ, शामनगर, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव, श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय मंडळ, नळेगांव,
तालुका चाकूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय विकास मंडळ,
नळेगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२५

२ सुनावणीची तारीख दि. २६-०८-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
सचिव, श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय मंडळ, नळेगांव,
तालुका चाकूर, जिल्हा लातूर

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय विकास मंडळ,
नळेगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २०-०४-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. ०१-०६-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १२-०८-२०११ च्या पत्रान्वये सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ओमशिवा विश्वनाथ लिगाडे, व्दारा, वसंतराव कदम, मातृवंदन, कोटलवार किराणा दुकानाजवळ, शामनगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय मंडळ, नळेगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय विकास मंडळ, नळेगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. साळुंके नारायण किशनराव,<br>हुलसुरे निवास, संत कबीर नगर, रेल्वे स्टेशन जवळ, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बिबराळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बिबराळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर - श्री. मरे बबुवान पांडुरंग | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर - श्री. पोतदार बाळाजी जनार्धनराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८-०७-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये जो त्यांच्या कार्यालयात दिनांक १७-०४-२०१० रोजी प्राप्त झाला सन २००८-०९ या कालावधीची बाराव्या वित्त आयोगाबाबत मौजे बिबराळ, तालुका शिरुर (अ) या ग्रामपंचायतीची विविध मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यामध्ये कॅशबुक, पासबुकच्या प्रमाणित प्रती, देयक मंजूर केलेल्या प्राधिकरणाचे नाव, रस्त्याच्या लांबीरुंदीची माहिती इत्यादी विस्तृत माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. तथापि त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित होती अशी माहिती अपिलार्थीस दिनांक ११-०८-२०१० रोजी देण्यात आली. अपिलार्थीने याची पोच दिली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या माहिती अर्जावर भविष्यात विहित मुदतीत माहिती पुरविण्याकरिता दक्ष राहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २६-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साळुंके नारायण किशनराव, हुलसुरे निवास, संत कबीर नगर, रेल्वे स्टेशन जवळ, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बिबराळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.